# विदर्भ प्रजासत्ताक

RNI No. - MAHMAR 2023/84526

https://epaper.vidarbhaprajasattak.com E-Mail : prajasattaknews24@gmail.com Postel Regi. No. - AMT/RNP 546/2024-2026

❑ वर्ष - २ रे ❑ अंक -१६१ वा ❑ अमरावती (महाराष्ट्र) ❑ शनिवार दि.२० जुलै २०२४ ❑ संपादक - शुभांगी जोशी ❑ मुल्य - १ रु. ❑ पृष्ठ -६


## जम्मू खोऱ्यात दहशतवाद्यांचा शोध घेण्यासाठी लष्कराची युद्धपातळीवर मोहिम, ५०० पॅरा कमांडो तैनात

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२० जम्मू**

गेल्या काही दिवसात जम्मू खोऱ्यात झालेले दहशतवादी हल्ले आणि दहशतावाद्यांची घुसखोरी झाल्याची शक्यता लक्षात घेता लष्कराने पुर्ण ताकद जम्मू खोऱ्यात पणाला लावली आहे. याआधीच निमलष्करी दल,जम्मू काश्मीर पोलीस दल या व्यतिरिक्त लष्कराचे तीन हजार पेक्षा जास्त जवान हे युद्धपातळीवर दहशतवाद्यांचा शोध घेत आहेत. असं असतांना लष्कराने सुमारे ५०० पॅरा कमांडो हे जम्मू खोऱ्यात उतरवले आहेत अशी माहिती एनडीटीव्हीने एएनआय या वृत्तसंस्थेने हवाल्याने दिली आहे.



पॅरा कमांडो हे लष्कराचे एक विशेष अंग म्हणून ओळखले जातात. अत्यंत प्रतिकूल परिस्थितीत विशेष मोहिमा, कामिगिरी हे या पॅरा कमांडोंवर सोपवल्या जातात. आता एवढ्या मोठ्या संख्येने पॅरा कमांडोंना दहशतवाद्यांच्या शोधण्यासाठी लष्कराने उतरवल्याने पुढील काही दिवस दहशवादी विरोधातील कारवाईमुळे जम्मू खोरे हे ढवळून निघणार हे निश्चित.एकूण ५० ते ५५ दहशतवादी जम्मू खोऱ्यातील काही भागात लपले असल्याचा प्राथमिक अंदाज आहे. गुप्तचर विभागानेही जम्मू खोऱ्यात यंत्रणा अधिक सक्रिय केली असून दहशतवाद्यांना मदत करणाऱ्या, आश्रय देणाऱ्यांच्या दिशेने तपास सुरु केला आहे.

## ४१ दिवसांनी आचारसंहिता लागू होणार उद्धव ठाकरेंनी विधानसभेचं रणशिंग फुंकले

### भगवा सप्ताहाची घोषणा

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२०मुंबई**

लोकसभा निवडणुकांच्या निकालानंतर आता विधानसभा निवडणुकांची रणधुमाळी सुरू झाली आहे. त्यातच, नुकतेच राज्यातील महायुती सरकारचे यंदाच्या कार्यकाळातील शेवटचे अधिवेशन पार पडले. त्यामध्ये, विविध घोषणा करत सर्वसामान्य जनतेला आपल्याकडे आकर्षित करण्याचा प्रयत्न राज्य सरकारने केला आहे. त्यात, मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना सुरू करुन महिलांना दरमहा १५०० रुपये देण्याचा निर्णय झाला असून त्याची अंमलबजावणीही सुरू झाली आहे. त्यावरुन, विरोधक सत्ताधाऱ्यांना लक्ष्य करत आहेत. शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांनी आजही या योजनांवरुन सरकारला लक्ष्य केलं. त्यानंतर, शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाची सेनाभवन येथे उद्धव ठाकरे यांच्या उपस्थितीत विधानसभा संपर्कप्रमुखांची बैठक पार पडली. या बैठकीतून उद्धव ठाकरेंनी विधानसभेचं रणशिंगच फुंकलं आहे.



भाजपने विधानसभा निवडणुकांसह आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांचीही तयारी केली आहे. तर, सर्वच राजकीय पक्ष विधानसभा निवडणुकांसाठी कामाला लागले असून पदाधिकारी मेळावा आणि कार्यकर्त्यांसाठी बैठकांचं आयोजनही केलं जात आहे. त्याच पार्श्वभूमीवर आज उद्ध ठाकरे यांनी शिवसेना भवन येथे पक्षाच्या विधानसभा संपर्क प्रमुखांचा मेळावा घेतला. त्यामध्ये, पुढील ४१ दिवसात आचार संहिता लागेल, त्यामुळे जोमाने काम करा, असे निर्देशच उद्धव ठाकरे यांनी विधानसभा संपर्कप्रमुखांना दिले आहेत. त्यामुळे, उद्धव ठाकरेंनी विधानसभा निवडणुकांचे रणशिंग फुंकताना आचारसंहिता कधी लागू होणार, याची तारीखच सांगितली आहे.

शिवसेना ठाकरे गटाकडून ४ ऑगस्ट ते ११ ऑगस्टपर्यंत भगवा सप्ताहाचे आयोजन करण्याचेही विधानसभा संपर्कप्रमुखांना सांगण्यात आलं आहे. या भगवा सप्ताहमध्ये विधानसभा क्षेत्राचा आढावा घेऊन त्याची माहिती सेनाभवन येथे सादर करायची आहे. त्यामध्ये विविध कार्यक्रम आढावा बैठका घेण्याचे आदेश देण्यात आले आहेत. तसेच आगामी विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर पुढील ४ महिन्यात पंधरा दिवसातून दोन दिवस विधानसभा क्षेत्रात संपर्कप्रमुखांनी स्वतः उपस्थितीत राहून आढावा घेण्याचे आवाहनही उद्धव ठाकरे यांनी संपर्कप्रमुखांना केले आहे.

## जागांसाठी आग्रह करणार नाही, राज्याला स्थिर सरकार देणे हेच आमचे मुख्य उद्दिष्ट: शरद पवार

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२० जुन्नर**

आगामी विधानसभा निवडणुकीच्या जागावाटपाबाबत महाविकास आघाडीचे तीनही पक्ष एकत्र बसून निर्णय घेतील. हीच जागा द्या किंवा तीच जागा द्या, असा आग्रह आम्ही करणार नाही. आम्हाला राज्याला स्थिर सरकार द्यायचे आहे, हे आमचे मुख्य उद्दिष्ट आहे, असा निर्धार शरद पवार यांनी व्यक्त बोलून दाखवला. पत्रकारांशी बोलताना शरद पवार यांनी अनेकविध मुद्द्यांवर भाष्य केले.



उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या नेतृत्वाखालील राष्ट्रवादीचे जुन्नर विधानसभा मतदारसंघातील आमदार अतुल बेनके यांनी राष्ट्रवादी शरदचंद्र पवार पक्षाचे अध्यक्ष शरद पवार यांची भेट घेतली आहे. शिरूरचे खासदार डॉ. अमोल कोल्हे यांच्या निवासस्थानी झालेल्या या भेटीनंतर अतुल बेनके यांच्या पक्षांतराविषयी चर्चा रंगू लागल्या आहेत. पत्रकार परिषदेत याबाबत शरद पवार यांना प्रश्न विचारण्यात आला होता. हे अतुल बेनके कोण आहेत? एखाद्या पक्षाच्या अध्यक्षाने यांना उत्तर द्यावे, इतका महत्त्वाचा माणूस आहे का हा? तुम्ही कोणाबद्दल विचारायला हवे अन् कोणाला महत्व द्यायला हवे, हे ठरवायला हवे, असे शरद पवारांनी म्हटले आहे.

केंद्रीय मंत्री आणि भाजपाचे ज्येष्ठ नेते अमित शाह महाराष्ट्र दौऱ्यावर येणार असल्याचे म्हटले जात आहे. यावर बोलताना शरद पवार म्हणाले की, महाराष्ट्राच्या जनतेने त्यांना त्यांची जागा दाखवली आहे. आता बघा पाच वर्षांपूर्वी काँग्रेसचा एक आणि राष्ट्रवादीचे चार खासदार निवडून आले. यावेळी महाराष्ट्राच्या जनतेने ४८ पैकी ३१ खासदार निवडून दिले. याचा अर्थ जनतेचा कल बदलेला आहे. आता जनतेने आमच्याकडे अपेक्षा ठेवल्या आहेत, असे शरद पवार यांनी सांगितले.

दरम्यान, मनोज जरांगेना कोणती आश्वासने दिली, हे सरकारने सांगितले का? छगन भुजबळ यांच्या भेटीनंतर सरकारने मनोज जरांगे यांना दिलेल्या आश्वासनांची माहिती मागितली होती. आम्हाला अजिबात कोणी संपर्क साधला नाही. त्यांच्यात काय चर्चा झाली, याची मला कल्पना नाही, असे शरद पवार यांनी म्हटले आहे.

## अमरावतीसह विदर्भात पहाटेपासून संततधार....जनजीवन विस्कळीत

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२०अमरावती**

विदर्भातील काही जिल्ह्यांना हवामान खात्याने पावसाचा रेड अलर्ट दिला असून विजांच्या कडकडाटासह पावसाचा अंदाज वर्तवण्यात आला आहे. विदर्भात पहाटेपासून मुसळधार पाऊस दाखल झाला असून अनेक ठिकाणी ढगफुटी सदृश्य पाऊस झाला आहे. विजांचा कडकडाट आणि ढगांच्या गडगडाटासह मुसळधार पावसाने ठाण मांडले असून नागपूर वर्धेसह अनेक जिल्ह्यात शाळांना सुट्टी जाहीर करण्यात आली आहे.



ग्रामीण भागात नदीनाले भरण्याच्या मार्गावर आहेत. लाखांदूर ते गोंदिया जिल्ह्यातील अर्जुनी मोरगाव मार्गे जाणाऱ्या पिंपळगाव/को येथील नाल्यावरुन पाणी वाहत आहे. काही ठिकाणी प्रामुख्याने गडचिरोली, गोंदिया, भंडारा, नागपूर, चंद्रपूर, यवतमाळ, वर्धा, अमरावती, अकोला, वाशिम येथे काही भागात जोरदार पावसाच्या सरी कोसळत आहेत. दक्षिण पश्चिम नागपुरातील बऱ्याच भागात रात्री दोन ते पहाटे पाच या वेळेत वीज पुरवठ्याचा लपंडाव सुरू होता. तर काही भागात अजूनही विजसेवा ठप्प झाली आहे. राज्यातील अनेक भागात गेल्या ४८ तासांपासून मुसळधार ते मध्यम स्वरूपाच्या पावसाने हजेरी लावली आहे.दरम्यान येत्या २४ तासात गडचिरोली, यवतमाळ, गोंदिया, अमरावती जिल्ह्याला मुसळधार पावसाचा इशारा देण्यात आला आहे.

**अमरावती जिल्ह्यात सर्वदूर पाऊस**

अमरावती जिल्ह्यात आज सकाळपासूनच पावसाने जोरदार हजेरी लावली आहे अमरावती जिल्ह्यात हा पाऊस सर्वत्र पडत असल्याने नदी ,नाले ओसंडून वाहत आहे चांदूरबाजार तालुक्यामध्ये सोनोरी भागात मोठ्या प्रमाणात पाऊस पडल्याने शेतकऱ्यांचे नुकसान झाले आहे. तर पूर्णा गावामध्ये हि पावसाचे पाणी घुसल्याने अनेकांच्या घराचे नुकसान झाले असल्याची प्राथमिक माहिती आहे .

## प्रकल्पग्रस्तांनी मानलें आमदार रवी राणा यांचे आभार

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२०अमरावती**

विदर्भातील प्रकल्पग्रस्त शेतकऱ्यांच्या समस्या गेल्या अनेक वर्षांपासून प्रलंबित असून त्यासाठी हजारो प्रकल्पग्रस्तांनी विविध प्रकारचे ऐतिहासिक आंदोलने केलीत सरकारच्या सोबत अत्यंत सकारात्मक बैठकी सुध्दा झाल्यात आमदार रवी राणा यांनी अनेक वेळा सभागृहात प्रकल्पग्रस्तांचे प्रश्न उपस्थित केलेत परंतु अंतिम निर्णय झाला नव्हता अखेर आमदार रवी राणा व प्रतापअडसड यांनी प्रकल्पग्रस्तांचे मुद्दे राज्याचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या लक्षात आणुन दिले.व सतत पाठपुरावा केला.नुकतेच राज्याचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी पावसाळी अधिवेशनात दिनांक ११ जूलै रोजी प्रकल्पग्रस्तांच्या समस्यांवर विधान भवनात बैठक बोलावली होती.त्यामध्ये प्रकल्पग्रस्तांच्या सरळ खरेदी, प्रकल्पग्रस्तांना नौकरी किंवा ३० लाख रुपये सानुग्रह अनुदान व प्रकल्पग्रस्तांसाठी स्वतंत्र आर्थिक विकास महामंडळ स्थापन करण्या संदर्भात सविस्तर चर्चा करण्यात आली.यावेळी उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी विदर्भातील सरळ खरेदी धारक शेतकऱ्यांना सानुग्रह अनुदान देण्याचा महत्त्वपूर्ण निर्णयाला तत्वतः मान्यता दिली.व प्रकल्पग्रस्तांसाठी स्वतंत्र आर्थिक विकास महामंडळ निर्माण करण्याचे मान्य केले.त्यामुळे प्रकल्पग्रस्तांमध्ये आनंदाचे वातावरण दिसून येत असुन विदर्भ बळीराजा प्रकल्पग्रस्त संघर्ष संघटनेच्या लढ्याला खऱ्या अर्थाने यश मिळाले आहे. रवी राणा यांनी केलेल्या सहकार्यासाठी प्रकल्पग्रस्तांनी त्यांच्या घरी जाऊन त्यांचे शाल श्रीफळ व पुष्पगुच्छ देऊन त्यांचा सत्कार केला.व आभार व्यक्त केले.यावेळी संघटनेचे संस्थापक अध्यक्ष मनोजभाऊ चव्हाण, सरपंच गौतमराव खंडारे, सरपंच अविनाश संख्ये, सरपंच भरतनाथ गहुकार, पंजाबराव दुर्गे, शंकरराव तायदे, संदिप मेटांगे,भारत मानकर, बाळकृष्ण मानकर, अरुणराव संख्ये, श्रीरामजी गावनेर, प्रभाकर गीरणार, प्रभाकर गीरनाडे, प्रमोद मानकर,राजु जोंधळे, बाळु भाऊ भाणगे, मंगेश इंगोले, नानाभाऊ दुर्गे,शुभम रोकडे, इत्यादी विदर्भ बळीराजा प्रकल्पग्रस्त संघर्ष संघटनेचे पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.



## काँग्रेस फुटीर आमदारांवर खरंच कारवाई करणार की फक्त फार्स?



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२० मुंबई**

१२ जुलैला पार पडलेल्या विधानपरिषद निवडणुकीत काँग्रेसची सात मतं फुटल्याचा संशय असून विरोधात मतदान केलेल्यांच्या विरोधात तत्काळ कारवाई केली जाईल, असं प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांनी जाहीर केलं होतं. मात्र, आठवडा उलटला तरी कारवाईसंदर्भात पक्षाकडून अद्याप काहीच जाहीर करण्यात आलेलं नाही. त्यामुळं फुटीर आमदारांवर खरंच कारवाई होणार की २०२२ प्रमाणे अभय दिलं जाणार? असा सवाल उपस्थित केल्या जातोय.

यासंदर्भात बोलताना ज्येष्ठ राजकीय विश्लेषक हेमंत देसाई म्हणाले की, महाराष्ट्रातील राजकारणात आणि काँग्रेस पक्षात २०२२ आणि २०२४ यामधील काळात खूप बदल झालाय. तत्कालीन महाविकास आघाडी सरकारच्या काळात झालेल्या विधानपरिषद निवडणुकीनंतर अवघ्या दहा दिवसात सरकार कोसळलं होतं. त्यावेळी देशात आणि राज्यात काँग्रेस पक्षाची ताकद कमी होती. मात्र, तेव्हाच्या तुलनेत आज काँग्रेस दुप्पट शक्तिशाली झालीय. त्यामुळं विधानपरिषद निवडणुकीत फुटलेल्या आमदारांवर कारवाई करण्यास काँग्रेस समर्थ आहे. मात्र, सध्याच्याघडीला फुटीर आमदारांवर शिस्तभंगाची कारवाई केली तर उपयोग होणार नाही. कारण, विधानसभा निवडणूक तोंडावर असल्यानं पक्षातून निघलेले आमदार महायुतीसोबत जातील.

आमच्याकडं सर्व माहिती आली असून आम्ही कारवाई करण्यास सुरुवात केलीय. याप्रकरणी भविष्यात कारवाई झालेली तुम्हाला दिसेल कारण पक्षात शिस्त महत्वाची आहे. फुटीर आमदारांवर शिस्तभंगाची कारवाई न करता त्यांना विधानसभेची तिकिट न देऊन अद्दल घडवण्याचा अधिकार पक्षाकडं आहेच. त्यामुळं कारवाईसंदर्भात चिंतेचं कारण नसल्याचं हेमंत देसाई म्हणाले. तर २०२२ साली झालेल्या विधानपरिषद निवडणुकीत देखील काँग्रेसचे काही आमदार फुटले होते. मात्र, त्यावेळी पक्षाकडून फुटीर आमदारांना अभय दिलं गेलं. आता त्याची पुनरावृत्ती झाली असून पक्ष त्या सात आमदारांवर शिस्तभंगाची कारवाई करून त्यांचं निलंबन करणार का? की फक्त बैठका आणि मोठ मोठी विधानं करून कारवाईचा फार्स दाखवण्याचा प्रयत्न करणार, हे आता वेळच सांगेल.असे के सी वेणुगोपाल, राष्ट्रीय सरचिटणीस म्हणाले.

## जागा एक दावेदार दोन! बाप-लेकात रस्सीखेच, मागे कोण हटणार?उमेदवारी कोणाला मिळणार याबाबत उत्सुकता

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२०नागपूर**

विधानसभा निवडणुकीसाठी सर्वच जण तयारीला लागले आहेत. इच्छुकांनी तर मोर्चे बांधणीही सुरू केली आहे. एका मतदार संघावर अनेकांनी दावे केले आहे. त्यामुळे राजकीय पक्षांसमोर कोणाला उमेदवारी द्यायची हा पेच आहे. पण एक मतदार संघ असा आहे ज्यावर बाप लेकाने दावा केला आहे. तो मतदार संघ आहे काटोल. या मतदार संघावर राष्ट्रवादी शरद पवार गटाकडून माजी मंत्री अनिल देशमुख आणि त्यांचा मुलगा सलील देशमुख याने दावा केला आहे. त्यामुळे उमेदवारी कोणाला मिळणार याबाबत उत्सुकता आहे.

नागपूर जिल्ह्यातील काटोल विधानसभा मतदार संघातून अनिल देशमुख हे विजयी झाले होते. राष्ट्रवादी काँग्रेसमधील फुटीनंतर त्यांनी अजित पवारां ऐवजी शरद पवारांची साथ देण्याचा निर्णय घेतला. मविआ सरकारमध्ये त्यांच्याकडे गृह खातं होतं. आता विधानसभा निवडुका घोषीत होतील. या निवडणूक रिंगणात उतरण्याची तयारी अनिल देशमुख यांनी केली आहे. तशी इच्छाही त्यांनी बोलून दाखवली आहे. पण सलील देशमुखही या मतदार संघातून निवडणूक लढण्यास इच्छुक आहेत. त्यावर बोलताना त्यानेही मतदार संघात का केले आहे, त्यामुळे तो ही उमेदवारी मागू शकतो असे त्यांनी स्पष्ट केले.



सलील देशमुख यांनी जिल्हा परिषदेची निवडणूक लढवली आहे. सलील हे अनिल देशमुख यांचे पुत्र आहेत. आता त्यांना विधानसभा निवडणूक लढायची आहे. विधानसभा लढण्यात आपण इच्छुक असल्याचे त्यांनी सांगितले. या मतदार संघात आपले वडील अनिल देशमुख ही इच्छुक असल्याचे ते म्हणाले. शिवाय काही कार्यकर्तेही इच्छुक आहेत. तेही उमेदवारी मागू शकतात असे सलील यांनी स्पष्ट केले. उमेदवारी कोणाला द्यायची याचा निर्णय मात्र पक्षश्रेष्ठी घेतील असे ही त्यांनी सांगितले.

सलील यांनी मतदार संघात बरीच कामे केली आहेत. त्यामुळे त्यांनी उमेदवारीसाठी दावा केला आहे. त्यांचे वडील अनिल देशमुखही ते मान्य करतात. असं असलं तरी खरा पेच पक्ष नेतृत्वा समोर आहे. शरद पवारांनी जास्तीत जास्त उमेदवारी ही तरूण चेहऱ्यांना देणार असल्याचे आधीच स्पष्ट केले आहे. त्यामुळे उमेदवारी मिळवण्याच्या रेसमध्ये सध्या तरी सलील हे पुढे आहेत असे चित्र आहे. पण लेकासाठी बाप थांबणार का हे पहावं लागणार आहे.




## संपादकीय ......

# बिबट्यांनो परत फिरा रे..!

मराठवाड्याची राजधानी म्हणून ओळखल्या जाणार्या छत्रपती संभाजीनगरमध्ये गेल्या चार-पाच दिवसांत दोन बिबट्यांनी धुमाकूळ घातलेला आहे. बिबट्या हा निशाचर प्राणी असल्यामुळे रात्रीच्या वेळी तो सक्रिय होतो आणि पहाटेपर्यंत भक्ष्याच्या शोधात फिरत राहतो. विदर्भात भरपूर जंगल आहे. त्यामुळे कधी शहरात, कधी जंगलात असे करत बिबट्यांना उदरनिर्वाहाची काळजी करण्याची गरज पडली नसती. बिबट्या पहिल्यांदा या शहरात दिसला तो भल्या पहाटे फिरायला जाणार्या लोकांना. पहाटेच पाच वाजता तयार होऊन टी-शर्ट, स्पोर्टस् शूज आदी घालून बाहेर पडलेल्या लोकांना त्याचे प्रथम दर्शन झाले. साहजिकच दुसर्या दिवशीपासून लोक सावधगिरीने सकाळी फिरायला लागले. जीवावर आल्यासारखे आणि डॉक्टरांनी सांगितले म्हणून कसेबसे फिरायला जाणार्या लोकांनी तत्काळ सकाळच्या प्रभातफेरीचा उपक्रम बंद करून टाकला. सहाजिकच आहे. जीव वाचला तरच कोलेस्ट्रॉल कमी करता येईल आणि हृदयविकाराचा धोका टाळता येईल; पण बिबट्याच्या हल्लयात जीवच गेला, तर कोलेस्ट्रॉल कितीही कमी असले तरी त्याचे काय करायचे, हा प्रश्न बर्याच लोकांच्या पुढे उभा राहिला.

अशीच काहीशी परिस्थिती रात्री पार्टी करून घरी उशिरा येणार्या लोकांची पण झाली. मित्रांबरोबर यथेच्छ पार्टी करून अस्वलासारखे झुलत झुलत घरी परतणार्या लोकांनी बिबट्याच्या दहशतीने जे काय अपेयपान करायचे ते घरीच करायला सुरुवात केली. यामुळे महिलावर्गाला मात्र सुखाची बरसात झाल्यासारखे वाटत असेल. पहिली गोष्ट म्हणजे, संध्याकाळच्या घातक वेळी नवरा डोळ्यांसमोर राहणार आहे म्हणून त्यांनी बिबट्याचे आभारच मानले असतील. दुसरी तितकीच महत्त्वाची गोष्ट म्हणजे देर राततक भटकत स्वतःच्या शरीराची हानी करून घेणारा नवरा निमूट घरी बसल्यामुळे महिलांचे कुंकू बळकट झाले म्हणूनही त्या बिबट्यांचे आभार मानत असतील. छत्रपती संभाजीनगरमधील महिलांनी बिबट्यांना या गावामध्ये नियमित फिरा, अशी विनंती केली, तर आश्चर्य वाटू देऊ नका.

ज्या गावातील वाहतूक व्यवस्था पूर्णत: कोलमडलेली आहे, ज्या गावांमध्ये मनपाच्या नळाला दहा -दहा दिवस पाणी येत नाही, ज्या गावात धुळीचे आणि दुर्गंधीचे साम-ाज्य पसरलेले आहे त्या गावांची निवड बिबट्याने करावीच का, असा प्रश्न उभा राहतो. दिवसा नाहीतर कमीत कमी रात्री फिरून तरी किमान पक्षी या अस्ताव्यस्त पसरलेल्या शहराला नियंत्रणात आणण्याचे काम बिबटे मंडळी करत आहेत, याबद्दल त्यांचे अभिनंदन! पिंजरे एका ठिकाणी लावलेले असताना तो संपूर्ण भाग वगळून बिबटे भलत्याच ठिकाणी सीसीटीव्हीमध्ये दिसून येत आहेत. छत्रपती संभाजीनगरात आल्यामुळे बिबट्यांनाही एक वाईट सवय लागलेली आहे असे दिसून येते. प्रोझोनसारख्या भल्या मोठ्या मॉलमध्ये चार तास विंडो शॉपिंग करून एकही रुपया खर्च न करता परत येताना मात्र शंभर रुपयाची भेळ खाऊन विंडो शॉपिंगचा आनंद घेण्याची प्रवृत्ती बिबट्यांमध्ये दिसून आलेली आहे. सीसीटीव्ही कॅमेर्यात एक बिबट्या मॉलमध्ये मनसोक्त फिरताना दिसला. समोर बिबट्या आला, तर काय करावे यासंदर्भात वन विभागाने काही मार्गदर्शक सूचना जनतेसाठी पाठविल्या आहेत. यातील महत्त्वाची सूचना म्हणजे बिबट्या समोर आला तर वाकू नका, अशी आहे.

# मका पिकावरील नवीन लष्करी अळीचे असे करा नियंत्रण, जाणून घ्या सविस्तर

**विदर्भ प्रजासत्ताक दि.२० अमरावती –** मका पिकावर नवीन लष्करी अळीचा प्रादुर्भाव वाढताना दिसून येत आहे. त्याअनुषंगाने शेतकऱ्यांनी मका पिकावर नवीन लष्करी अळीचा प्रादुर्भाव कमी करण्यासाठी एकात्मिक व्यवस्थापनाचा वापर करुन मशागत, भौतिक, जैविक व

कृषी विशेष




रासायनिक पध्दतीची उपाययोजना करावी, असे आवाहन जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी विवेक सोनवणे यांनी प्रसिध्दी पत्रकान्वये केले आहे.

मका पिकावरीलनवीन लष्करी अळीची एक पिढी उन्हाळ्यात ३० दिवसात पूर्ण होत असून हिवाळ्यात ६० दिवसाचा कालावधी आढळून आला आहे. एका वर्षात ३ ते ४ पिढ्या विविध वनस्पतीवर पुर्ण होऊ शकतात. पतंगांची संख्या एप्रिल ते डिसेंबर या कालावधीत भरपूर प्रमाणात आढळते. या अळीची अंडी पुंजक्याने पानावर घातली जातात. एक मादी तिच्या जीवनकाळात सरासरी १५०० ते २००० अंडी घालू शकते.

तसेच पूर्ण वाढ झालेल्या अळीच्या तोंडावर पांढऱ्या रंगाचे उलट्या वाय आकाराचे चिन्ह दिसते. या अळी अंड्यातून बाहेर पडताच हिरवा पापुद्र खातात. त्यामुळे पानांवर पांढरे चट्टे दिसतात. तसेच दुस-या व तिसऱ्या अवस्थेतील अळ्या पानांना छिद्रे करतात, पानांच्या कडा खातात व कणसाला छिद्र करुन दाणेही खातात. त्याअनुषंगाने मका पिकाचे नुकसान टाळण्यासाठी शेतकऱ्यांनी एकात्मिक व्यवस्थापनाचा वापर करावा, असे पत्रकात सूचित करण्यात आले आहे.

**एकात्मिक व्यवस्थापनाच्या पद्धती –**

**मशागत पध्दत :** उन्हाळ्यात खोल नांगरट करावी. पीक फेरपालट करावी. मका घेतलेल्या पिकात भुईमुग अथवा सूर्यफूल पीक घ्यावे. सापळा पीक म्हणून मक्याचे बाजूने नेपिअर गवताची लागवड करावी. मक्यात तूर, उडीद तसेच मुग या पिकांची आंतरपीक म्हणून लागवड करावी.

**भौतिक पध्दत :** मका पेरणी नंतर एकरी १० ते १२ पक्षी थांबे उभारावेत. मका पानांवरील अंडीपुंज व नवजात अळ्या गोळा करून नष्ट कराव्यात. कीड सर्वेक्षणासाठी एकरी पाच कामगंध सापळे लवावेत. तसेच मोठ्या प्रमाणात नर पतंग पकडण्यासाठी एकरी ८ ते १० कामगंध सापळे लावावेत.

**जैविक पध्दत :** मका पिकात १५०० पी.पी.एम. ॲझाडीरॅक्टीन ५० मिली किंवा १०००० पी.पी.एम. १० मि.ली. प्रति १० ली. पाणी या प्रमाणात सुरवातीच्या वाढीच्या अवस्थेत फवारावे. प्रादुर्भाव दिसू लागताच जैविक कीटकनाशक मेटारायझियम (नोमुरिया) रीलेई किंवा मेटारायझियम अनिसोपली ५० ग्रॅम प्रती १० लीटर पाण्यात मिसळून सकाळी लवकर अथवा सायंकाळी ४ वा. नंतर फवारणी करावी. ट्रायकोग्रामा बॅक्टरी (ट्रायको कार्ड) १.५ लाख अंडी हेक्टरी सोडावेत.

**रासायनिक पध्दत :** थायमेथोझ्याम १२.६ % सी. जी. + लॅबडा सायहॅलोथ्रीन ९.५ % झेड. सी. २.५ मि.ली. किंवा स्पिनोटॅरम ११.७% एस.सी. ५ मि.ली. किंवा क्लोरोनट्रॅनीलप्रोल १८.५% एस.सी. ४ मि.ली. या कीटकनाशकांची आलटून पालटून गरजेप्रमाणे १५ दिवसाचे अंतराने फवारणी करावी.

# जागा अडवणाऱ्या फेरीवाल्यांवर होणार कारवाई - उपायुक्त माधुरी मडावी






**विदर्भ प्रजासत्ताक दि.२० अमरावती–** इतवारा परिसरात अतिक्रमण निर्मूलनाची कारवाई उपायुक्त माधुरी मडावी यांच्या उपस्थितीत आज इतवारा परिसरात अतिक्रमण निर्मूलनाची कारवाई करण्यात आली. यावेळी रस्त्यावरील साहित्य उचलण्यात आले. प्रत्येक दुकानदाराने दोन डस्टबीन ठेवण्याचे निर्देश यावेळी उपायुक्त यांनी दिले. दुकाना पुढील पूर्ण स्वच्छता करण्याचे निर्देशही यावेळी देण्यात आले. संबंधित स्वास्थ निरीक्षकाला परिसरातील संपूर्ण स्वच्छता करण्याचेही निर्देश यावेळी देण्यात आले. इतवारा परिसर संपूर्ण स्वच्छ व्हावा याच्यासाठी या परिसरातील स्वच्छता कर्मचारी, व्यापारी व हॉकर्स यांनी संयुक्त स्वच्छता मोहीम राबवावी अशा सूचना यावेळी त्यांनी दिल्या. इतवारा परिसरातील भाजी मार्केट मध्ये नालीवर कोणीही दुकान लावू नये असे सक्त निर्देश यावेळी त्यांनी दिले. शहरातील अतिक्रमण, पदपथांवर मुक्काम ठोकणारे फिरस्ते आणि अनधिकृत बांधकामांवर नियंत्रण ठेवण्यासाठी महापालिका प्रशासनाकडून संयुक्त कारवाई केली जात आहे. या अनुषंगाने उपायुक्त माधुरी मडावी यांनी आज दिनांक १९ जुलै,२०२४ रोजी इतवारा बाजार परिसरातील दुकानदारांची पाहणी केली. पाहणी दरम्यान प्रत्येक दुकानदारांची भेट घेवून त्यांच्याशी चर्चा केली. यावेळी दुकाना बाहेरील कचरा आढळून आल्याने सदर दुकानदाराला त्वरीत साफ करण्याचे निर्देश उपायुक्त माधुरी मडावी यांनी दिले.यावेळी वैद्यकीय अधिकारी स्वच्छता डॉक्टर अजय जाधव ,सहाय्यक आयुक्त भुषण पुसतकर, नंदकिशोर तिखिले, अतिक्रमण पथक प्रमुख श्याम चावरे, बाजार परवाना अधिक्षक उदय चव्हाण, उद्यान अधीक्षक श्रीकांत गिरी, स्वास्थ अधिक्षक श्रीकांत डवरे, स्वास्थ निरीक्षक, अतिक्रमण विभागातील कर्मचारी, पोलीस कर्मचारी उपस्थित होते.

## आरोग्य संपदा आहार विशेष

# बाळांना जपा संसर्गापासून

**विदर्भ प्रजासत्ताक दि.२० अमरावती** लहान बाळाला जवळ घेणे, कवटाळणे, मांडीवर घेऊन थोपटणे हा सर्व ममत्वाचा, मायेचा भाग असतो. याच मायेपोटी मुलांचा पापा घेतला जातो. लहान बाळ असेल तर त्यालाही त्यातून आनंद मिळतो. परंतु आई-बाबा वगळता अन्य व्यक्तींनी मुलांचा सतत पापा घेणे, त्याच्या आरोग्यासाठी नुकसानदायक ठरू शकते. अन्य व्यक्तींनी मुलांचा सतत पापा घेतल्यास तोंडावाटे काही संसर्ग बाळापर्यंत पोहोचू शकतात.



जसे की, हॉकचा संसर्ग, या विषाणूमुळे बाळाला कोल्द सोअर होऊ शकतो. एखाद्या सर्दी झालेल्या प्रौढ व्यक्तीने पापी घेतल्यास बाळाला हा त्रास होऊ शकतो. बाळाला ओठांवर किंवा तोंडाभोवती लहान फोड येऊ शकतात आणि ते चेहऱ्याच्या इतर भागांमध्ये देखील पसरू शकते, एका अहवालानुसार, एकदा या व्हायरसने शरीरामध्ये प्रवेश केला, की हा काही लगेच आपला पिच्छा सोडत नाही.लहान मुलाचे चुंबन घेतल्यामुळे त्यांच्या दातांमध्ये पोकळी निर्माण होऊ शकते. लाळेमध्ये असलेल्या स्ट्रेप्टोकोकस म्युटान्स बॅक्टेरियामुळे काठाच्या दातांमध्ये पोकळी निर्माण होऊ शकते. याखेरीज पापा घेतल्याने बाळाला ॲलर्जी होण्याची शक्यता असते.जसे की लिपस्टिकमध्ये ब्लूटेन असते, जे सेलिआक रोग असलेल्या बाळासाठी हानिकारक ठरू शकते. त्यामुळे कधीही बाळाच्या ओठांवर पापी घेणे टाळावे. नवजात बालकांना सुरुवातीच्या महिन्यांत आजार होण्याची अधिक शक्यता जास्त असते .कारण त्यांच्या आतड्यांतील जीवाणू यावेळी विकसित होत असतात. त्यामुळे अनेक तज्ज्ञ सांगतात की, बाळाला घेण्यापूर्वी हात आणि तोंड धुवावे. तसेच बाळाचे चुंबन घेतल्यामुळे जंतू जाऊ शकतात, ज्यामुळे बाळाची रोगप्रतिकारक शक्ती कमकुवत होऊ शकते हे लक्षात घेता, बाळाजवळ जाताना मास्कचा वापर करावा. आई-वडिलांनीही आपल्याला सर्दी-खोकला झाला असल्यास, बाळाची पापी घेगे टाळावे.

# दूध उत्पादक शेतकऱ्यांकरिता अनुदान योजना

## योजनेचा लाभासाठी ३० सप्टेंबरपर्यंत अर्ज सादर करण्याचे आवाहन

**विदर्भ प्रजासत्ताक दि.२० अमरावती–** राज्यातील सहकारी संघ व खाजगी दूध प्रकल्पांना दूध पुरवठा करणाऱ्या दूध उत्पादक शेतकऱ्यांना गाय दुधासाठी प्रतिलिटर पाच रुपये अनुदान देण्याबाबत शासनाने निर्णय घेतलेला आहे. या योजनेचा कालावधी ३० सप्टेंबरपर्यंत वाढविण्यात आला आहे. त्यानुषंगाने योजनेत सहभागी होण्यासाठी राज्यातील सहकारी दूध संघ, खाजगी दूध प्रकल्प, दूध शितकरण केंद्र व फार्मर प्रोड्युसर कंपनी (दुग्धव्यवसायाशी संबंधित) आदींनी आयुक्त, दुग्धव्यवसाय विकास विभाग, मुंबई यांच्याकडे दि. ३० सप्टेंबरपर्यंत अर्ज सादर करण्याचे आवाहन प्रादेशिक दुग्धव्यवसाय विकास अधिकारी सचिन यादव यांनी प्रसिध्दीपत्रकाव्दारे केले आहे.

शासनाने जाहिर केलेल्या गाय दुधाकरिता प्रतिलीटर पाच रुपये अनुदान योजनेचा लाभ घेण्यासाठी सहकारी संघ, खाजगी दूध प्रकल्प, दूध शितकरण केंद्र व फार्मर प्रोड्यसर कंपनी (दुग्धव्यवसायाशी संबंधित) आदींनी विहीत नमुन्यातील अर्ज आयुक्त, दुग्धव्यवसाय विकास विभाग, महाराष्ट्र राज्य मुंबई यांच्याकडे दि. ३० सप्टेंबरपर्यंत अर्ज सादर करणे बंधनकारक आहे. अनुदान योजनेत सहभागी होणाऱ्या सहकारी दूध संघ व खाजगी दूध प्रकल्प, दूध शितकरण केंद्र व फार्मर प्रोड्यसर कंपनी यांनी डी.बी.टी. करण्यासाठी दूध उत्पादक शेतकऱ्यांचे बँक खाते त्यांचा आधारकार्डशी व पशुधनाच्या कानातील बिल्लयाशी संलग्न (लिंक) करणे आवश्यक आहे. या योजनेत दूध उत्पादक शेतकरी दूध संघास किंवा खाजगी प्रकल्पास दूध पुरवठा करतात ते शेतकरी, सहकारी संघ किंवा खाजगी प्रकल्पांमार्फत तसेच दूध शितकरण केंद्र व फार्मर प्रोड्युसर कंपनी योजनेत सहभागी होवू शकतात. अर्ज करणाऱ्या पात्र सहकारी संघ व खाजगी दूध




प्रकल्पांना या योजनेच्या अंमलबजावणीसाठी शेतकऱ्यांचे डाटा अपलोड करण्यासाठी लॉगीन आयडी व पासवर्ड देण्यात येतील. या अगोदर योजनेत सहभागी प्रकल्पांना अगोदरच्याच लॉगीन आयडी व पासवर्ड व्दारे डाटा अपलोड करता येईल.अमरावती महसूल विभागातील सर्व जिल्ह्यांतील दुध उत्पादक शेतकऱ्यांना आवाहन करण्यात येते की, गाईच्या दुधासाठी (३.५ -८.५) या गुणप्रतीच्या संकलीत केलेल्या दुधास प्रतिलिटर रु. ५ अनुदान देण्याच्या योजनेस अटी व शर्तीच्या अधिन राहून दुध उत्पादक शेतकऱ्यांनी ते दुध पुरवठा करीत असलेल्या सहकारी संघ, खाजगी दूध प्रकल्प, दुध शितकरण ते दुध प्रोड्युसर कंपनी यांचेमार्फत आपला डाटा अपलोड करुन घ्यावा, व त्याचप्रमाणे गाय दुधाकरीता प्रतिलिटर ५ रु. प्रमाणे शासकीय अनुदान योजनेचा लाभ घ्यावा. तसेच संगणक प्रणालीमध्ये दुध उत्पादक शेतकऱ्यांचा डाटा भरणाऱ्या प्रकल्पांना देखील रु ०.०५/- लिटर याप्रमाणे प्रोत्साहनपर रक्कम मिळणार असल्याने अमरावती विभागातील सहकारी संघ, खाजगी दूध प्रकल्प, दूध शितकरण केंद्र फार्मर प्रोड्युसर कंपनी (दुग्धव्यवसायाशी संबंधित) यांनी दुध उत्पादक शेतकऱ्यांना सदर योजनेचा लाभ मिळेल याकरीता प्रयत्न करावे, असे आवाहन प्रादेशिक दुग्धव्यवसाय विकास अधिकारी श्री. यादव यांनी केले आहे.

# निवड यादी ४२ दिवसानंतर आज होणार प्रसिध्द

## २२ जुलैपर्यंत पालकांना एसएमएस मिळणार
## २३ ते ३१ जुलै दरम्यान शाळांमध्ये मिळणार प्रवेश

**विदर्भ प्रजासत्ताक दि.२० अमरावती:** न्यायप्रविष्ट असलेल्या आरटीई प्रवेश प्रक्रियेचा निकाल शुक्रवारी जाहीर होताच पालकांना अखेर दिलासा मिळाला. शासनाचा ९ फेब्रुवारीचानिर्णयरद्दकरीत ७ जुनरोजी काढलेल्या सोडतीनंतर निवड यादी प्रसिध्द करण्याचे आदेश दिले आहे. त्यामुळे आज शनिवार रोजी आरटीई प्रवेशाची यादी पोर्टलवर प्रसिध्द करून २२ जुलै पर्यंत पालकांना मोबाइलव्दारे प्रवेशाचे संदेश प्राप्त होतील. त्यानंतर २३ ते ३१ जुलै दरम्यान कागदपत्रांच्या पडताळणीनंतर बालकांचे प्रवेश संबधित शाळांमध्ये निश्चित केले जाणार आहे.

यंदा शैक्षणिक वर्ष १५ जूनपासून सुरूझाले. तर जिल्ह्यात एक जुलैपासून शाळा सुरू झाल्या. त्यामुळे शाळा सुरू होऊन एक महिनाहोत असताना आरटीई प्रवेश प्रक्रिया रखडली होती. राज्य शासनाने आरटीई कायद्यात केलेल्या बदलामुळे हे प्रकरण आतापर्यंत न्यायप्रविष्ट होते. तेव्हापासून या प्रवेश प्रक्रियेला ब्रेक लागला होता.




तत्पूर्वी या याचिकांवर ११ जुलैरोजी उच्चन्यायालयात अंतिम सुनावणी पार पडली. न्यायालयीन सुनावणी पुर्ण होवुन न्यायालयाने निकाल राखून ठेवला होता. शुक्रवारी निकाल जाहीर करीत शासनाच्या ९ जुलैचा निर्णय रद्द करीत तब्बल ४२ दिवसांपासुन रखडलेली निवड यादी प्रसिध्द करण्याचे आदेश न्यायालयाने दिले आहे. जिल्ह्यात आरटीईच्या २३२ शाळांमधील २ हजार ३६९ जागांकरीता ६ हजार ३७७ अर्ज आले आहेत. यातील विद्यार्थ्यांच्या प्रवेशाची ऑनलाईन लॉटरी काढण्यात आली आहे. याची निवड यादी शनिवारी आरटीई पोर्टलवर जाहीर केली जाणार आहे. त्यानंतर २२ जुलैपर्यंत बालकांच्या पालकांना मोबाइलव्दारे संदेश देवुन २३ ते ३१ जुलै दरम्यान समितीकडे कागद पत्रांची कागदपत्रांची पडताळणी करावयाची आहे. पडताळणी नंतरच संबधित शाळांमध्ये प्रवेश निश्चित केले जाणार आहे.

RNI No. - MAHMAR 2023/84526
Postel Regi. No. - AMT/RNP 546/2024-2026

कोणत्याही शंका किंवा अभिप्रायासाठी आम्हाला ईमेल करा -prajasattaknews24gmail.com
या पृष्ठावरील जाहिरातींसाठी किंवा मोफत अंक मो.वर मिळण्यासाठी संपर्क मो.८६२४९८५६३३, प्रिंट / PDF / वेब - पोर्टल /ई - पेपर

# विदर्भ प्रजासत्ताक

द्वितीय मुखपृष्ठ


# आक्षेपामुळे केंद्र प्रमुखांची पदोन्नती वाद्यांत

## ५३ जणांना बढती, पण, १० दिवसानंतरही आदेश नाही

**विदर्भ प्रजासत्ताक दि.२०अमरावती** अनेक वर्षांपासून केंद्र प्रमुखांच्या पदोन्नतीला मुहुर्त मिळाला जणांना परंतु सदरची प्रक्रिया नियमबाह्य करण्यात आल्याचा प्रहार शिक्षक संघटनेच्या आक्षेपामुळे मात्र शिक्षण विभाग चांगलाच अडचणीत सापडला आहे. त्यामुळे पदोन्नतीची प्रक्रिया पुर्ण करून सुध्दा पदोन्नतीचे आदेश या आक्षेपामुळे रखडले आहे. सीईओ संजिता मोहपात्रा यांनी सदर प्रक्रियेला ब्रेक लावून आधी आक्षेपाचे निराकरण करण्याच्या सुचना शिक्षण विभागाला दिल्या आहे. त्यामुळे या प्रक्रियेकडे सीईओ स्वता लक्ष ठेवून आहे.जिल्ह्यात १३९ केंद्र प्रमुखांची पदे मंजुर आहेत. यातील ६९ पदे ही भरतीने तर ७० पदे पदोन्नतीने भरणे अपेक्षित आहे. यातील १७पदेकार्यरत असुन ५३ पदांकरीता पदोन्नतीचा प्रक्रिया ९ जुलै रोजी राबविण्यात आली. पदोन्नतीकरीता प्रशिक्षित पदविधर विषय शिक्षक व मुख्याध्यापक अशा १६६जणांना बोलाविण्यात आले होते. यामध्ये सर्वसा धारणच्या १६० पैकी

### आता पदोन्नतीचा मुद्दा सीईओंच्या दालणात

५१ जणांना तर दिव्यांग संवर्गातुन ६ पैकी २ जणांना केंद्रप्रमुख म्हणुन पदोन्नती देण्यात आली आहे. समुपदेशनाव्दारे पदोन्नती झालेल्यांना ठिकाण देखील देण्यात आले. परंतु आज १० दिवस लोटूनही या केंद्रप्रमुखांना पदस्थापनेचे आदेश देण्यात आले नाही. या

या आक्षेपाकडे दुर्लक्ष करीत शिक्षण विभागाने ही प्रक्रिया राबविली. दरम्यानदिर्घरजेवरून परतलेल्या सीईओ संजिता मोहपात्रा या प्रक्रियेबाबत अनभिज्ञ होत्या. त्यामुळे ही प्रक्रिया राबविताच प्रहार शिक्षक संघटनेने प्रहार शिक्षक संघटनेने सीईओंच्या ही बाब निदर्शनास आणुन दिल्यानंतर आधी आक्षेपाचे निराकरण करा तसच आदेश द्या अशा सुचना देत सीईओंनी या प्रक्रियेला ब्रेक लावला आहे. त्यामुळे शिक्षण मात्र आता चांगलाच अडचणीत सापडला आहे.

# जिल्ह्यात ६.३१ लाख हेक्टरवर खरीप पेरणी

## सोयाबिनची २ लाख ५० हजार हेक्टरवर, कापुस दुसऱ्या क्रमांकावर २ लाख २२ हजार हेक्टर

### दर्यापूर, धामणगाव तालुक्यात १०० टक्के पेरणी पूर्ण

**विदर्भ प्रजासत्ताक दि.२० अमरावती–** जिल्ह्यात जुलैमध्ये पावसाचा जोर कायम असल्याने शेतकऱ्यांनी पेरणीला गती देत मोठ्या प्रमाणात पिकांची लागवड केली आहे. ६ लाख ८१ हजार ७७९ हेक्टर क्षेत्रापैकी ६ लाख ३१ हजार २७६ हेक्टर क्षेत्रावर खरीपाच्या पेरण्या आटोपल्या आहेत. याची टक्केवारी ९३ टक्के आहे. यंदाही सोयाबिनची सर्वाधिक २ लाख ५० हजार ९०७ हेक्टरवर तर कापसाची २ लाख २२ हजार ५६१ हेक्टरवर पेरणी करण्यात आलेली आहे. त्या पाठोपाठ तुरीची १ लाख ११ हजार ७२ हेक्टरवर पेरणी करण्यात आली आहे.



जिल्ह्यात जुनमध्ये विखुरलेल्या पावसामुळे शेतकऱ्यांनी पेरण्यांना ब्रेक दिला होता. ३० जुन दरम्यान ५० टक्केदेखील पेरण्या नसताना मात्र जुलैमध्ये पावसाचा जोर वाढल्याने शेतकऱ्यांनी पेरणीच्या कामांना झपाट्याने सुरूवात केली.

या २० दिवसातच पेरणीची टक्केवारी ९३ टक्केवर पोहचली आहे. यामध्ये दर्यापूर आणि धामणगाव रेल्वेयादोन तालुक्यात शंभर टक्केच्यावर पेरणी आटोपली आहे. धारणी, अमरावती, भातकुली, नांदगाव खंडेश्वर, अंजनगाव सुर्जी व अचलपूर या सहा तालुक्यात ९० टक्केच्यावर तर यातील अमरावती आणि अंजनगाव सुर्जी या दोन ६ तालुक्यात ९५ टक्केच्यावर पिकांची लागवड करण्यात आली. जिल्ह्यात ६ लाख ८१ हजार ७७९ हेक्टर पेरणी योग्यक्षेत्र असुन यापैकी आजतोवर ६ लाख ३१ हजार २७६ हेक्टरवर पेरणी आटोपली आहे.

या खरीपात सोयाबिनलाच पहीली पसंती शेतकऱ्यांनी दिली तर कापुस दुसऱ्या व तुर तिसऱ्या क्रमाकावर आहे. या महीना अखेरीस जिल्ह्यात शंभर टक्के पेरणी पुर्ण होण्याचा अंदाज कृषी विभागाने वर्तविला आहे.

पेरणीत वरूड तालुका माघारला पेरणीमध्ये वरूड तालुका सर्वात माघारला आहे. या तालुक्यात आजवर केवळ ७८ टक्केचपेरणी आटोपली आहे.

५० हजार ८१० पेरणीक्षेत्र असलेल्या वरूड तालुक्यात ४० हजार २२ हेक्टरवर पेरणी करण्यात आली आहे. तर धामणगाव रेल्वे तालुका मात्र पेरणीत अव्वल असुन येथे १०३ टक्के पेरणी आटोपली आहे.

**पिकनिहाय पेरणी क्षेत्र (हेक्टरमध्ये)**

| | |
|---|---|
| सोयाबिन– | २,५०,९०७ |
| कापुस– | २,२२,५६१ |
| तुर – | १,११,०७२ |
| मका – | २४,६६८ |
| ज्वारी – | ५,९८४ |
| धान – | ४,८०० |
| बाजरी – | १५२ |
| मुंग – | ९७१ |
| उडीद – | ७०२ |
| भुईमुंग – | ४४९ |
| तीळ– | ११३ |
| ऊस– | २३ |

# अतिसार नियंत्रणासाठी उपाययोजना राबवा; आरोग्य विभागाचे आवाहन



**विदर्भ प्रजासत्ताक दि.२०अमरावती,** पावसाळ्यात बळवणाऱ्या अतिसार संसर्गाला नियंत्रणासाठी स्वच्छ पाणी, संतुलित आहार, शिळे अन्न न खाने, स्वच्छ हात धुणे, परीसर व वैयक्तिक स्वच्छता ठेवणे अशा विविध उपाययोजना राबविण्याचे आवाहन जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. सूरेश असोले यांनी केले आहे.प्राथमिक आरोग्य केंद्र टेंभूरसोंडा अंतर्गत खटकाली या गावात अतिसाराचे रूग्ण मोठया प्रमाणात आढळून आले होते. या घटनेची जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. सुरेश असोले, अतिरिक्त जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. प्रविण पारिसे, साथरोग वैद्यकीय अधिकारी तसेच इतर जिल्हास्तरीय व तालुकास्तरीय चमू यांनी गावात भेट देऊन गावातील नागरीक, ग्रामपंचायत सदस्य, आरोग्य कर्मचारी यांच्या सोबत चर्चा करण्यात आली. तसेच दैनंदिन क्लोरिनेशन करून ओ. टी. टेस्ट, दैनंदिन सर्वेक्षण करण्याचेही सूचना दिल्या.

# आधार कार्ड अपडेटच्या नावाखाली फसवणूक

## व्हॉटसअपवर माहिती भरली अन, ७५ हजार उडाले

**विदर्भ प्रजासत्ताक दि.२० अमरावती** आधार कार्ड अपडेटच्या नावाखाली व्हाटसअपवर फाईल पाठवली, त्यात आधार कार्ड, पिन नंबर आणि मोबाईल नंबर टाकायला सांगितला, आणि थोडयाच वेळात खात्यातून ७५ हजार रुपये गायब झाले. यासंदर्भात अज्ञात मोबाईलधारकाविरुध्द परतवाडा पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे. परतवाडा छोटा बाजार येथील अब्दुल



वहिद अब्दलरशिद (४२) यांची फसवणूक करण्यात आली आहे. ९८४९४६४०२२ या मोबाईलधारकाने त्यांच्या व्हाटसअपवर आधार कार्ड अपडेट युनियन बँक एपीके नावाची फाईल पाठवली, आणि त्यामध्ये आधार कार्ड, मोबाईल नंबर आणि पिन नंबर भरायला सांगितले. ही माहिती भरल्यानंतरकाही वेळातच खात्यातून ७५ हजार २१ रुपये गायब झाल्याचे निर्दशनास आले. अब्दुल वहिद अब्दुल रशिद यांनी परतवाडा पोलिसांकडे यासंदर्भात तक्रार केली असून, पोलिसांनी अज्ञात मोबाईलधारकाविरुध्द कलम ३१८ (२), ३१८ (४) ६६ सीआयटी ॲक्ट नुसार गुन्हा दाखल केला आहे.

# धामणगावरेल्वे मतदारसंघातील ११ तीर्थक्षेत्रांना ब दर्जा

## चांदूररेल्वे तालुक्यातील सहा संस्थानचा समावेश

### आ. प्रताप अडसड यांच्या प्रयत्नांना यश

**विदर्भ प्रजासत्ताक दि.२० चांदूररेल्वे धामणगाव** रेल्वे मतदारसंघातील ११ तीर्थक्षेत्रांना व दर्जा आमदार प्रताप अडसड यांच्या प्रयत्नांनी प्राप्त झाला. यामध्ये चांदूररेल्वे तालुक्यातील सहा संस्थानचा समावेश आहे.

महायुती सरकारच्या दोन वर्षाच्या कार्यकाळात एकुण १२ तीर्थक्षेत्रांना व दर्जा प्राप्त करून घेण्यास आमदार प्रताप अडसड यांना यश आले आहे. यापैकी १ आधी तर ११ तिर्थक्षेत्रांना आता १९ जुलै रोजी ब दर्जा प्राप्त झाला आहे. पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर ग्रामीण यात्रास्थळ योजना ब वर्ग अंतर्गत ग्रामीण तीर्थक्षेत्रांना ब वर्ग दर्जा देण्याकरिता आमदार प्रताप अडसड यांनी महाराष्ट्राचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, अजित पवार व ग्रामविकास मंत्री गिरीश महाजन यांच्याकडे सातत्याने पाठपुरावा केला. या पाठपुराव्याला अखेर यश आले. श्री क्षेत्र नाग मंदिर चांदूरवाडी, श्री क्षेत्र अवधूत महाराज संस्थान कारला, श्री संत योगी भिकाजी महाराज संस्थानआष्टा, श्री संत एकनाथ



महाराज संस्थान आमला विश्वेश्वर, रामनाथ स्वामी संस्थान वाढोना रामनाथ, श्री क्षेत्र ऋषी महाराज संस्थान त्रिवेणी संगम, नागोबादेवस्थान भिलटेक, श्री क्षेत्र विठ्ठल रुक्मिणी मंदिर संस्थान शेलुगुंड, श्री – सुरेश बाबा संस्थान फुबगाव, श्री संत खप्ती महाराज संस्थान बागापुर, श्री संत बुदगीर महाराज व श्री संत अमृत महाराज देवस्थान सार्सी असे धामणगाव मतदारसंघातील एकुण ११ या तीर्थक्षेत्रांना ब वर्ग दर्जा प्राप्त झालेला आहे. यापूर्वी चांदूररेल्वे तालुक्यातील मांजरखेड कसबा येथील तीर्थक्षेत्राला सुद्धा ब दर्जा प्राप्त करून वाढीव निधीची उपलब्धता आ.प्रताप अडसड यांनी करून दिली होती.

# बिझीलॅण्ड, सिटीलॅण्ड, ड्रीमलॅण्ड येथील परीक्षा केंद्रावरील संचालकांची मनमानी

## आधारकार्डऐवजी पर्यायी ओळखपत्र अमान्य, अनेकांच्या संधीला डच्चू

**विदर्भ प्रजासत्ताकदि.२०अमरावती** शासनाने नेमलेल्या बिझिलँड, सिटीलँड, ड्रीमलँड येथील खासगी परीक्षाकेंद्रावरील संचालकांची मनमानी अनेक परीक्षार्थी उमेदवारांच्या संधीला डच्चू देत आहे. आधारकार्ड आणि प्रवेशपत्रावरील नावात तफावत असली तर त्याऐवजी दुसऱ्या ओळखपत्राला अमान्य ठरविण्यात येत असल्याने परीक्षार्थ्यांना परिक्षेपासूनच वंचित ठेवले जात आहे.

सिटीलँड येथील आय ओ एनडिजिटल झोन आय डी झेड या परीक्षाकेंद्रावर गोंदिया, यवतमाळ जिल्हा परिषद सुपरवायझर पदाची परीक्षा गुरूवारी (ता.१८) होती. या परीक्षेसाठी चांदुरबाजार तालुक्यातील घाटलाडकी येथील कुसुम बारकाजी रेवस्कर

तसेच दर्यापूर येथील उज्वला यशवंतराव डोंगरे या परीक्षार्थी परीक्षेकरीता नियोजित वेळेवर उपस्थित होत्या. मात्र विवाहित असल्याने आधारकार्ड आणि प्रवेशपत्रावरील नावात तफावत असल्याने केंद्रसंचालकांनी त्यांना परीक्षेस बसण्यास मज्जाव केला. एवढेच नव्हे तर कुसुम रेवस्कर यांच्याकडे पॅनकार्ड असून देखील त्यांना परीक्षेला बसू दिले नाही. उज्वला यांच्याकडे नावात बदल असलेले तहसीलदारांचे प्रतिज्ञापत्र असून देखील त्यांना परिक्षेपासून वंचित ठेवण्यात आले. तीनही ठिकाणी असणाऱ्या परीक्षा केंद्रावर वारंवार हा प्रकार होतो. त्यामुळे दूरवरून आलेल्या अनेक परिक्षार्थ्यांना नाहक मानसिक त्रास सहन करावा लागतो.दोन्ही परिक्षार्थ्यांनी अनेकवेळा विनंती करून देखील केंद्रसंचालकांनी थेट बाहेर निघण्याचा सल्ला दिला. ते एवढ्यावरच थांबले नाहीत तर सुरक्षारक्षकांकडून हाकलून देण्याची सुद्धाधमकी देण्यात आली.

# उद्याला मनसे चा पदाधिकारी,कार्यकर्ता मेळावा

## मनसे नेते संदीप देशपांडे, राजू उंबरकर, मनसे उपाध्यक्ष आनंद एंबडवार,विठ्ठल लोखंडकार यांची राहणार उपस्थिती

**विदर्भ प्रजासत्ताक दि.२० अमरावती–** विधानसभा निवडणूकांचे लक्ष्य डोळ्यापुढे ठेऊन महाराष्ट्र नवनिर्माण सेना अमरावती जिल्हा शाखेतर्फे पदाधिकारी व कार्यकर्ता मेळावा उद्या रविवार (ता.२१) स्थानिक अभियंता भवन येथे आयोजिण्यात आलेला आहे. मनसे नेते संदीप देशपांडे, राजू उंबरकर, मनसे उपाध्यक्ष आनंद एंबडवार आणि विठ्ठल लोखंडकार यांची उपस्थिती या मेळाव्याला राहणार आहे.

महाराष्ट्र नवनिर्माण सेना विधानसभा निवडणूकीत राज्यभरात उमेदवार रिंगणात उतरविण्याच्या तयारीत आहे. निवडणूकीत कशा पद्धतीने रणनिती आखून काम करायचे तसेच कोणत्या मतदारसंघात उमेदवार उभे करायचे याची चाचपणी देखील यावेळी केली जाणार आहे. रविवार २१ जुलै रोजी अभियंता भवन येथे दुपारी ३ वाजता होत असलेल्या मेळाव्यात जिल्हाभरातील मनसेच्या विविध सेलचे सर्व पदाधिकारी आणि कार्यकर्ते सहभागी होणार आहेत. विधान सभा निवडणूकांच्या अनुषंगाने मनसेने तयारी सुरू केली असून या मेळाव्यानंतर अमरावती जिल्ह्यात मनसे एक वेगळेच राजकीय वातावरण तयार करेल, असा विश्वास मनसेचे नेते पप्पू पाटील यांनी व्यक्त केला आहे. या मेळाव्याला मनसेच्या सर्व पदाधिकारी तसेच कार्यकर्त्यांनी उपस्थित राहण्याचे आवाहन मनसेचे जिल्हाध्यक्ष राज पाटील, शहराध्यक्ष धीरज तायडे, गौरव बांते, माजी जिल्हाध्यक्ष कपिल निर्गुण, राजेंद्र गायगोले, शेतकरी सेनेचे जिल्हाध्यक्ष राम दुर्गे तसेच जिल्हा कार्यकारिणीचे पदाधिकारी गजानन काजे, मनोज तायडे, नितीन चौखंडे, विजय पोटे, अक्षय काजे, नितीन लुंगे, रावसाहेब काजळकर, निलेश मुधोळकर, पुरूषोत्तम काळे, प्रवीण डांगे, बबलू आठवले, सचिन बावनेस, विकी थेटे, सुशील पाचघरे, पवन सावरकर, हर्षल ठाकरे, मयंक तांबुसकर, अश्विन सातव, प्रणव देशमुख, संगीता मडावी, अमन मडावी, रोशन शिंदे आदींनी केले आहे.

# क्षयरोग मुक्त ४२ ग्रामपंचायतीचा जिल्हाधिकाऱ्यांच्या हस्ते सत्कार

## क्षयरोग मुक्त ग्रामपंचायत होण्यासाठी प्रयत्न करा– सौरभ कटियार

**विदर्भ प्रजासत्ताक दि.२० अमरावती,–** क्षयरोग मुक्त भारत २०२५ पर्यंत पूर्ण करण्यासाठी केंद्र व राज्य शासन विविध उपक्रम राबवित आहे. त्याचाच एक भाग म्हणून क्षयरोग मुक्त ग्रामपंचायतीसाठी ७० ग्रामपंचायतीची निवड करण्यात आली होती. त्यापैकी शासनाने ठरवून दिलेल्या निकषामध्ये पात्र झालेल्या ४२ ग्रामपंचायतीना क्षयरोग मुक्त ग्रामपंचायत घोषीत करण्यात आल्या आहे. या ग्रामपंचायतीच्या सरपंच व ग्रामसचिव यांचा जिल्हाधिकारी सौरभ कटियार यांच्या हस्ते नुकतेच येथील ग्रामसेवक प्रशिक्षण केंद्र येथे सन्मानचिन्ह देवून गौरव करण्यात आला.

क्षयरोग मुक्त भारत करण्यासाठी इत्तर ग्रामपंचायतीने प्रेरणा घेऊन ग्रामपंचायतीमध्ये विविध उपाययोजना राबवून क्षयरोग मुक्त ग्रामपंचायत होण्यासाठी प्रयत्न करा, असे आवाहन जिल्हाधिकारी सौरभ कटियार यांनी केले.२०२४ मध्ये जास्तीत जास्त ग्रामपंचायत क्षयरोग मुक्त होण्याकरीता सरपंच, ग्रामसचिव व आशा यांनी निकषाप्रमाणे उद्दीष्ट साध्य करण्यासाठी प्रयत्न करण्याचे निर्देश मुख्य कार्यकारी अधिकारी संजीता मोहपात्रा यांनी दिले.

क्षयरोग मुक्त भारताचे उद्दीष्ट पूर्ण करण्यासाठी गाव पातळीवरील आरोग्य संस्था, उपकेंद्र, हेल्थ वेलनेस सेंटरचे कर्मचारी व अधिकारी व संबंधित ग्रामपंचायतीच्या पाठिब्यांने क्षयरोग दुरिकरणासाठी सातत्याने प्रयत्न करीत आहे. ग्रामीण भागातील समाजाला क्षयरोग मुक्त करण्यासाठी केंद्रीय क्षयरोग विभाग, आरोग्य व कुटूंब



कल्याण नवी दिल्ली यांचे सोबत पंचायतराज विभागाने सामंजस्य करारावर स्वाक्षरी करुन क्षयरोग मुक्तीसाठी उपाययोजना राबवित आहे.

क्षयरोग मुक्त ग्रामपंचायत करण्यासाठी सहा निकाष ठरवून देण्यात आली होती. ते याप्रमाणे : संशयीत क्षयरुग्ण तपासणी संख्या १ हजार लोक संख्येमध्ये ३० टक्के असणे, क्षयरुग्ण शोधण्याचे प्रमाण प्रति १ हजार लोकसंख्येमध्ये १ टक्का, क्षयरोगाचा उपचार यशस्वी होण्याचे प्रमाण ८५ टक्केपेक्षा जास्त, औषध संवेदनक्षमता चाचणी प्रमाण किमान ६० टक्के, निक्षय पोषण योजना शंभर टक्के व प्रधानमंत्री टीबी मुक्त भारत अभियान अंतर्गत क्षयरुग्णांना पोषण सहाय्य शंभर टक्के असावे.

क्षयरोग मुक्त ग्रामपंयातीसाठी २०२३ वर्षासाठी ७० ग्रामपंचायतीची निवड करण्यात आली होती. त्यापैकी ४२ ग्रामपंचायत सहा निकषामध्ये पात्र ठरविण्यात आले. निकषाची पुर्तता करण्याऱ्या ग्रामपंचायतीचे जिल्हाधिकारी, मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा शल्य चिकित्सक, जिल्हा आरोग्य अधिकारी तसेच सल्लागार जागतिक आरोग्य संघटना अकोला विभाग यांच्या हस्ते राष्ट्रपीता महात्मा गांधी यांचा पुतळा व प्रशस्तीपत्रक देवून गौरव करण्यात आला. तसेच तालुका आरोग्य अधिकारी व वैद्यकिय अधिकारी प्राथमिक आरोग्य केंद्र यांना सन्मानचिन्ह देवून गौरव करण्यात आला. यावेळी ग्रामपंचायतीचे सरपंच, ग्रामसचिव, तालुका आरोग्य अधिकारी, वैद्यकिय अधिकारी, तालुकास्तरीय एसटीएस व एसटीएलएस उपस्थित होते. जिल्हा आरोग्य अधिकारी यांनी प्रास्ताविक भाषणामध्ये टिबी मुक्त पंचायत उपक्रमाचे निकष उपस्थितांना अवगत केले. तसेच कार्यक्रमाची रुपरेषा व माहिती जिल्हा क्षयरोग अधिकारी यांनी विषद केली.

# नागपुरात ऑरेंज अलर्ट, आज शाळा, महाविद्यालयांना सुट्टी

**विदर्भ प्रजासत्ताक दि.२० नागपूर–** हवामान विभागाने नागपूर जिल्ह्यासाठी आज शनिवारी (दि. २० जुलै) मुसळधार पावसाचा ऑरेंज अलर्ट दिला आहे. दरम्यान, मुसळधार पावसामुळे नागपूर जिल्ह्यातील सर्व शाळा आणि महाविद्यालये २० जुलै रोजी बंद राहतील. हवामान विभागाने नागपुरात ऑरेंज अलर्ट जारी केला असल्याची माहिती नागपूरचे जिल्हाधिकारी डॉ. विपिन इटनकर यांनी दिली आहे. हवामान विभागाने नागपूरला २० जुलै रोजी ऑरेंज अलर्ट दिला आहे. या कालावधीत काही ठिकाणी खूप मुसळधार पाऊस पडण्याची शक्यता वर्तवलेली आहे. सुरक्षिततेच्यादृष्टीने जिल्हा प्रशासनाच्यावतीने वेळोवेळी दिल्या जाणाऱ्या सूचनांचे जिल्ह्यातील नागरिक आणि शेतकऱ्यांनी पालन करावे व स्वसंरक्षणासाठी सतर्क राहावे, असे आवाहन जिल्हाधिकारी डॉ. इटनकर यांनी केले आहे.



वीज गर्जना होत असताना शक्यतो घरातच राहणे आवश्यक आहे. अशा कालावधीमध्ये मोबाईल फोनसोबत बाळगू नका. याचबरोबर घरातील इलेक्ट्रिकल उपकरणे बंद ठेवावीत. पाऊस व वीज गर्जना होत असताना चुकूनही झाडाच्या खाली उभे राहू नये व शेतात काम करत असताना सुरक्षित ठिकाणी आसरा घ्यावा, असे जिल्हा प्रशासनाने म्हटले आहे. याशिवाय जल पर्यटन स्थळी उत्साहात, जीव धोक्यात घालणारी कुठलीही कृती करू नये, असेही सांगण्यात आले आहे.


शक्यतो पाण्यामध्ये उतरण्याचे धाडस करू नका. आपण कितीही चांगले जलतरणपटू असलो तरीदेखील अशा ठिकाणी पोहण्याचे टाळावे. नदी, नाले दुथडी भरुन वाहत असताना पाणी पुलावरून किंवा रस्त्यावरून वाहत असताना चुकूनही तो पूल किंवा रस्ता चालत किंवा गाडीमधून ओलांडण्याचा प्रयत्न करू नये असे आवाहन जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण, नागपूर जिल्हा नियंत्रण कक्ष, जिल्हाधिकारी कार्यालयाने केले आहे.

# मनपा,नपा, मनपाच्या शिक्षकांसाठी समितीचे गठण

## ३० दिवसात अहवाल सादर करण्याची सूचना

**विदर्भ प्रजासत्ताक दि.२० अमरावती –** महानगरपालिका,नगरपालिकेत कार्यरत शिक्षकांच्या आर्थिक व इतस समस्यांची तसेच

> राज्यातील नगर नगरपालिका, महानगरपालिका शाळांमधील कार्यरत शिक्षक तथा शिक्षके- तर कर्मचाऱ्यांच्या वेतनाकरिता शासनाकडून पूर्ण वेतन मिळत नसल्याने शिक्षकांच्या वेतन विषयक व आर्थिक समस्या कायमस्वरूपी मिटाव्यात, याकरिता शालेय शिक्षण विभा- गातर्फे १०० टक्के वेतन मिळावे तसेच जुनी पेन्शन योजना लागू व्हावी, याकरिता संघटना आग्रही असून समितीकडे निवेदनाच्या माध्यमातून म्हणणे मांडण्यात आले आहे. **– योगेश पखाले, (राज्यप्रमुख, मनपा-नप विभाग राज्य जुनी पेन्शन योजना)**



शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या सेवाविषयक व इतर धोरणात्मक बाबीबाबत शासनाकडून समितीची स्थापना करण्यात आलेली आहे.

शिक्षकांना वेतन वेळेवर न मिळणे, वेतन आयोग लागू न होणे तसेच वेतन आयोगाची थकबाकी पूर्ण न मिळणे, जिल्हा परिषद शिक्षकांप्रमाणे पदोन्नतीचे लाभ नसणे, पेन्शन योजना लागू नसणे अशा विविध सेवाविषयक बाबी, आर्थिक व इतर समस्या शिक्षकांना भेडसावत होत्या. त्याची सोडवणूक व्हावीयाकरिता शिक्षक संघटनांच्या वतीने वारंवार निवेदने, आंदोलनाच्या माध्यमातून मागणी केली जात होती. त्यावर शासनाने नगर परिषद प्रशासन संचालनालया मार्फत शासन स्तरावर समिती स्थापन केली. या समितीमध्ये नगरपरिषद प्रशासन संचालनालयाचे सहआयुक्त संजय काकडे यांची समितीच्या अध्यक्षपदी तसेच सहआयुक्त डॉ. नीलम पाटील यांची सदस्य सचिवपदी नियुक्ती केली आहे.

या समितीमध्ये विविध नगरपरिषद, महानगर पालिकेतील अधिकारी रोहिदास दोरकुळकर, नितीन कापडणीस , गणेश शिंदे, वैभव आवारे, धनंजय बोरीकर, प्रशांत शेळके, शैलेश फडसे यांची सदस्यपदी नियुक्ती केलेली आहे. नगरपरिषद प्रशासन संचालनाल याचे आयुक्त तथा संचालक मनोज रानडे यांच्या आदेशानुसार ही समिती स्थापन करण्यात आली. समितीला वरील मुद्यावर अभ्यास करून३० दिवसाच्या आत अहवाल सादर करण्यास सूचित केलेले आहे. सद्यस्थितीत राज्यात नप व मनपामध्ये १८,००० शिक्षक कार्यरत आहेत.

# नांदगावातील विविध समस्या घेऊन शिवसेनेच्या नेतृत्वात नागरिकांची न प वर धडक

## आठ दिवसांत समस्या सोडवा अन्यथा आंदोलन मुख्याधिकारी यांना निवेदन सादर

**दि.२०विदर्भ प्रजासत्ताक नांदगाव खंडेश्वर** स्वच्छतेवर शासनाचे वर्षाकाठी करोडो रुपये खर्च होत असून नांदगाव शहरात नगर पंचायत प्रशासनाच्या निष्क्रियतेने शहरातील स्वच्छेतेची पार ऐशी तैशी झाल्याचे पाहायला मिळते येते यासह शहरातील विविध समस्या घेऊन नागरिकांनी शिवसेनेचे प्रकाश मारोटकर यांच्या नेतृत्वात नगर पंच्यातवर धडक देऊन मुख्याधिकारी यांना निवेदन सादर केले आठ दिवसांत समस्या निकाली काढा अन्यथा आंदोलनाचा इशारा निवेदनातून दिलाशहरातील स्वचतेची दयनीय असलेली परिस्थिती मुख्यधिकारी यांच्या निदर्शनास आणून देण्या करिता नागरिकांनी शहरातील जुन्या आठवडी बाजारातील कन्या शाळे समोरील साचलेले कचऱ्याचे ढिगारे पाण्याचे साचलेले डपके शहरातील खंडेश्वर मंदिर बारी पुरा गोवारी पुरा पहूर रोड दांडगे कॉलनी या परिसरातील अनेक महिन्या पासून बंद असलेले



पथदिवे बस स्टॅन्ड वरील शौचालय व मुत्रीघराची दयनीय अवस्था पायका ग्राउंड वरील वाढलेले गवत त्या ठिकाणी असलेली ओपन जिम सभोवताली गांजर गवताचा विळखा यासह इत्यादी समस्या घेऊन नगर पंच्यातला निवेदन सादर केले दरम्यान नागरिकांची आक्रमक भूमिका पाहता प्रभारी मुख्याधिकारी नंदू पडळकर यांचेसह अभियंता शैलेंद्र मेटे शेख राहील यांनी प्रत्यक्ष समस्येच्या ठिकाणी जाऊन पाहणी केली यावेळी शिवसेनेचे प्रकाश मारोटकर शहर प्रमुख निलेश इखार शेख जहीर पवन शिरभाते समीर शेख, शेख मोनू शुभम रावेकर अक्षय हिवराळे अनिकेत गटुले इत्यादी नागरिक उपस्थित होते. शासनाने तात्काळ नियमित नांदगाव नगर पंचायत मुख्याधिकारी यांची नियुक्ती करावी.

# गांजाचीअवैध वाहतूक करणारे दोघे अटकेत

## ९ लाख ४० हजार रुपयांच्या गांज्या सह वाहन जप्त



**विदर्भ प्रजासत्ताक दि.२० अमरावती** नांदगाव खंडेश्वर येथून बडनेऱ्याला गांजा घेवून येणाऱ्या दोघांना बडनेरा पोलिसांनी बुधवारी रात्री अंजनगाव बारी मार्गावर अटक व त्यांच्या ताब्यातून ३१ किलो ११० ग्रॅम गांजा आणि वाहन असा एकूण ९ लाख ४० हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त केला. शेख मोहसिन शेख रशीद (वय ३२ रा. फुबगाव, ता. नांदगाव खंडेश्वर) आणि शेख जुनेद शेख अकलीम (वय ३१ रा. बुधवारा चौक, नांदगाव खंडेश्वर) अशी अटकेतील युवकांची नावे आहेत. बडनेरा पोलीस रात्री गस्तीवर असताना नांदगाव खंडेश्वर येथून अंजनगाव बारी मार्गाने मोठ्या प्रमाणात गांजा येत असल्याची माहिती पोलिसांना मिळाली. त्या आधारावर पोलिसांनी अंजनगाव बारी मार्गावरील लाड पेट्रोल पंपासमोर अंधारात सापळा रचला. दरम्यान रात्री १ वाजताच्या सुमारास लाल रंगाची मारुती सुझुकी कार क्र. एम.एच. ३१ डी.सी. ४२७८ बडनेऱ्याकडे येताना दिसली. पोलिसांनी कार थांबवून चालकासह दुसऱ्याला ताब्यात घेतले. कारची पाहणी केली

असता त्यामध्ये ३१ किलो ११० ग्रॅम गांजा आढळला. कारमधील व्यक्तींना अटक तसेच कार व दोन मोबाईल असा एकूण ९ लाख ४० हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त केला. न्यायालयाने त्यांना २२ जुलैपर्यंत पोलीस कोठडी सुनावली आहे.

ठाणेदार पुणीत कुलट यांच्या नेतृत्वात पोलीस निरीक्षक प्रफुल गिते, सहायक पोलीस निरीक्षक संदीप हिवाळे, पोलीस उपनिरीक्षक तुषार गावंडे, पोलीस कर्मचारी प्रमोद गुडघे, प्रेमचंद रावल, सुधीर गुडधे, मंगेश परिमल, संजय भेलाये, प्रविंद्र राठोड, महेंद्र वलके, शशीकांत शेळके, मनमोहन दहातोंडे, प्रविण देंगेकर, इरफान रायलीवाले, रामकृष्ण कांगडे, विशाल पंडित, अभिजीत गावंडे, आशुतोष ठाकूर, गजानन खडेकर आणि राकेश वाल्मीक यांच्या पथकाने ही कारवाई केली.

# कापुसतळणी येथे सुरू असलेल्या वरली मटक्याने ग्रामस्थ हैराण

## अनेक कुटूंब ऊध्वस्त होण्याच्या मार्गावर, पोलीस प्रशासनाने लक्ष देण्याची ग्रामस्थांची मागणी

**दि.२०विदर्भ प्रजासत्ताक अंजनगाव सुर्जी–** गेल्या काही वर्षांत तरुणाईमध्ये वाढत असलेल्या कमी गुंतवणूक करुन जास्त नफा कमावण्याच्या मानसिकतेमुळे अवैध धंद्याकडे अनेक तरुणांचा कल वाढला आहे.तर यातूनच वरली मटका आणि आता नविण जुगाराचा प्रकार तितली भवरा आल्याने कापूसतळणी येथील तरुणाई झटपट पैसे कमावण्याच्या नांदी लागली असुन पोलीस प्रशासन मात्र झोपेचे सोंग घेऊन बसली असल्याचे चित्र निर्माण झाले आहे.अंजनगाव सुर्जी तालूक्यातील कापूसतळणी हे सर्वात मोठे गाव असुन रहिमापुर चिंचोली पोलीस स्टेशन अंतर्गत येर्णाय़ा या गावामध्ये गेल्या अनेक दिवसापासुनन वरली मटक्याचा व्यवसाय राजरोसपणे सुरु होता.यात अनेक गोरगरिब,मजुरी करणारे कुटूंब,बेरोजगार तरुण झटपट श्रिमंत होण्याच्या लालसेपायी कष्टाची कमावलेली दोन तिनशे रुपये मजुरी या जुगारातलावण्याच्या सपाटा सुरु केला असुन यामूळे अस्वस्थ झालेल्या काही समाजसेवक नागरिकांनी याबाबत चिंता व्यक्त केली आहे.वरली मटका हा प्रकार सर्व परिचीत आहे. परंतू तितली भवरा हा प्रकार त्याही पेक्षा भयानक असुन यात पैसे लावणारी व्यक्ती लालसेपोटी एकाच दिवसी कमावलेली संपुर्ण रक्कम या जुगारात गमाऊन बसतो असे नाव न सांगण्याचा अटीवर एका व्यक्ती ने सांगितले. हा सर्व प्रकार गावातील मुख्य चौकाच्या आणि ग्रामपंचायत ईमारतीच्या आजुबाजूला होत असतांना कुणाच्याही लक्षात येऊ नये ? ही विचार करण्याची गोष्ट असुन रहीमापुर पोलीस स्टेशन अंतर्गत असलेल्या या गावामधील हा जुगार केव्हा बंद होणार असा प्रश्न सुज्ञ नागरिकांच्या मनात निर्माण होत आहे.तर गेल्या दहा वर्षात कधी येवढ्या मोठ्या प्रमाणात उधान न आलेल्या अवैध व्यवसायाला कारणीभुत कोण असा प्रश्न निर्माण होत आहे.

> **पोलीस स्टेशन असलेल्या गावातच खुलेआम वरली मटका**
>
> रहिमापुर चिंचोली येथे पोलीस स्टेशन असुन याच गावात चिंचोली बु येथे ग्रामपंचायत कार्यालय समोर खुलेआम वरली मटका चालत असुन एक व्यवसाय दर्यापूर तालुक्यातील एका राजकीय पुढार्यांचा असल्याची चर्चा आहे. पोलीस स्टेशन असलेल्या गावातच खुलेआम वरली मटका असल्याने पोलीस प्रशासनाच्या कार्यशैलीवर प्रश्नचिन्ह निर्माण होत आहे .तर हे अवैध व्यवसाय बंद करा अशी मागणी येथील नागरिक करीत आहे.

# जेष्ठ नागरिकांच्या सुसह्य जीवनासाठी संत गाडगेबाबा विद्यापीठ कटिबद्ध

## –डॉ.श्रीकांत पाटील

**दि.२०विदर्भ प्रजासत्ताक अमरावती –**जेष्ठ नागरिक अनुभव समृद्ध असतात. परंतु उतरत्या वयात शरीराच्या अनंत कुरबुरी सुरू झाल्यामुळे ते हतबल होतात. ह्या वेळी मुलं-मुली आपल्या संसारात रममाण झालेली असतात तर काही शिक्षण – नोकरी संदर्भात परदेशी असतात. तेव्हा आयुष्याच्या संध्याकाळी आपलं, जिव्हाळ्याचं काळजी घेणारं कोणीतरी जवळ असावं असं प्रकर्षानं जाणवतं, अशावेळी संत गाडगेबाबा विद्यापीठाच्या रूपाने या गलीतगात्र जेष्ठांना फार मोठा आधार लाभला आहे, असे मौलिक विचार प्रा.डॉ.श्रीकांत पाटील विभागप्रमुख, निरंतर शिक्षण व विस्तार विभाग श्री.संत गाडगेबाबा विद्यापीठ यांनी व्यक्त केले.स्थानिक जेष्ठ नागरिक सन्मित्र मंडळ, प्रयास भवन, फरशी स्टॉप येथील कार्यक्रम प्रसंगी ते बोलत होते. याप्रसंगी सभाध्यक्ष म्हणून जेष्ठ नागरिक सन्मित्र मंडळाचे अध्यक्ष प्रा. सुरेशराव नांदुरकर, प्रमुख व्याख्या तेद्वय प्रा.डॉ.श्रीकांत पाटील आणि प्रा.डॉ.अंबादास घुले निरंतर शिक्षण व विस्तार विभाग संत गाडगेबाबा विद्यापीठ अमरावती, मंडळ कार्याध्यक्ष श्री.दामोदरपंत उजवणे, तथा उपाध्यक्षद्वय श्री. वसंतराव सराफ, श्री. अनिलराव निपाणकर व्यासपीठावर विराजमान होते. यावेळी डॉ



श्रीकांत पाटील यांनी जेष्ठ नागरिकांसंदर्भात विद्यापीठाने सुरू केलेल्या अभिनव उपक्रमांची माहिती दिली. गरजवंत तथा जेष्ठ नागरिकांच्या सेवाशुश्रुषेसाठी मुलामुलिंचा एक वर्षिय नर्सिंग कोर्स सुरू केला असून प्रशिक्षणोत्तर हे मुलं मुली अगदी घरपोच सेवा देतील. याकरिता विद्यापीठात जेष्ठ नागरिक सहाय्यता कक्षाची स्थापना करण्यात आली आहे.याशिवाय योगासने, नॅचरोपॅथी, रोजगार मेळावा आदि अनेक उपक्रम राबविले जातात.तेव्हा जेष्ठ नागरिकांनी या सेवेचा अवश्य लाभ घ्यावा असे त्यांनी आवाहन केले.आपल्या अध्यक्षीय भाषणात प्रा.सुरेशराव नांदुरकर यांनी संस्कारक्षम संतती हीच खरी संपत्ती हे सुभाषित भारतीय साहित्य संस्कृतीतील अनेक दाखले देऊन सोदाहरण स्पष्ट केले. याप्रसंगी सौ.निर्मलाताई नांदुरकर, रजनीताई भवाळकर,विणाताई रेलकर, श्री.दिलिप शेलोटकर, उमेश वानखेडे यांनी गीतगायन करून कार्यक्रमाची शोभा वाढवली. अंकेक्षण अहवाल वाचन श्रीरामजी काळे यांनी तर श्री.दामोदरपंत उजवणे यांनी समायोचित मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचे बहारदार सूत्रसंचालन वसंतराव सराफ यांनी तर आभारप्रदर्शन दामोदर सुखसोहळे यांनी केले.

# अमरावतीसह राज्यातील जात पडताळणी समितीच्या अध्यक्षांची तात्काळ नियुक्ती करा – ॲड.यशोमती ठाकूर

**विदर्भ प्रजासत्ताक दि.२०अमरावती** 'राज्य शासनाने सध्या आठ लाखांपर्यंतचे उत्पन्न असलेल्या मुलींना उच्च शिक्षण मोफत देण्याचा निर्णय घेतला आहे. याकरिता जात पडताळणी प्रमाणपत्रांची आवश्यकता भासत असून सध्या राज्यातील अमरावतीसह २३ जिल्ह्यांमधील समित्यांना पूर्णवेळ अध्यक्षच नसल्याने या कामात मोठा अडथळा निर्माण झाला आहे. त्यामुळे सरकारने तातडीने २३ जिल्ह्यांमधील समित्यांना पूर्णवेळ अध्यक्षांची नियुक्ती करावी अशी मागणी आमदार ड.यशोमती ठाकूर यांनी केली आहे.समाज कल्याण विभागांतर्गत राज्यातील विविध शासकीय कार्यकर्ता लागणाऱ्या जात पडताळणी प्रमाणपत्रांची पडताळणी करून दिली जाते. यासाठी राज्य सरकारची जात पडताळणी समिती कार्यरत असते. मात्र गेल्या काही काळापासून राज्यातील २३ जिल्ह्यांमधील संविधाना पूर्णवेळ अध्यक्षच नसल्याची माहिती आमदार ड.यशोमती ठाकूर यांनी दिली आहे. अमरावती जिल्हा करिता असलेल्या जात प्रमाणपत्र पडताळणी समितीसाठी पूर्णवेळ अध्यक्ष कार्यरत नाहीत. अमरावती जिल्ह्याच्या प्रभार वाशिम जिल्ह्याचे जात पडताळणी समिती अध्यक्ष यांच्याकडे देण्यात आला आहे. तर त्यांच्याकडे याशिवाय नागपूर यवतमाळ वर्धा आधी जिल्ह्यांच्या जात पडताळणी समितीचे प्रभारी पद आहे. राज्य सरकारने नुकताच राज्यातील उच्च शिक्षण घेणाऱ्या मुलींसाठी मोफत शिक्षणाचा निर्णय घेतल्याने आठ लाख रुपयांपर्यंतचे उत्पन्न असलेल्या अशा मुलींना जात पडताळणी प्रमाणपत्र आवश्यक आहे. अभियांत्रिकीसह अन्य व्यावसायिक अभ्यासक्रमांचे प्रवेश सध्या सुरू असल्याने जात पडताळणी प्रमाणपत्रासाठी विद्यार्थ्यांची मोठ्या प्रमाणात जात पडताळणी कार्यालयात गर्दी होत आहे. मात्र, समितीच्या संत गतीमुळे हे प्रमाणपत्र मिळण्यास विद्यार्थ्यांना विलंब होत असून जात पडताळणी अभावी अनेक विद्यार्थ्यांना खुल्या प्रवर्गातून प्रवेश घ्यावा लागेल अशी गंभीर परिस्थिती निर्माण झाल्याचे आमदार ड. ठाकूर यांनी म्हटले. राज्यात सध्या मुंबई शहर, मुंबई उपनगर,



ठाणे, रायगड, सांगली, नाशिक, नंदुरबार, छत्रपती संभाजी नगर, परभणी, लातूर, धाराशिव, वाशिम व भंडारा या जिल्ह्यातच केवळ जातपडताळणी समितीला पुर्णवेळ अध्यक्ष आहे. मात्र सातारा, सोलापूर, कोल्हापूर, नागपूर, अहमदनगर, अकोला, जालना आणि बीड यासह २३ जिल्ह्यांमधील समित्यांना पुर्णवेळ अध्यक्ष नाहीत. विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होऊ नये, याकरिता अमरावतीसह उर्वरीत राज्यातील २३ जिल्ह्यामधील समित्यांना पुर्णवेळ अध्यक्षांची गरज असून या जिल्ह्यांमध्ये पूर्णवेळ अध्यक्षांची तातडीने नियुक्ती व्हावी अशी मागणी आमदार ड. ठाकूर यांनी सरकारकडे केली आहे.

# उद्याला गुरूकुंजात गुरुपोर्णिमा महोत्सवाचे आयोजन



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२० गुरुकूंज मोझरी**

राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांच्या महासमाधी परीसरात गुरुपोर्णिमा महोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे.आज दि.२१ रोजी पहाटे ४ वाजता पासुन महासमाधीचे पुजन होवुन सामुदायिक ध्यानाने महोत्सवाची सुरुवात होणार आहे.

*गुरू म्हणोनि न गुरगुरावे।*
*आत्मवत सर्वांसि जाणावे।*
*उठण्या-बसण्यापासूनि*
*शिकवावे। आईसारिखे अज्ञ*
*जना।।*

असा गुरुमंत्र आपल्या ग्रामगीतेतुन गुरुबद्दल राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांनी जनतेला दिला.परमहंस संत आडाकोजी महाराज हे राष्ट्रसंत तुकडोजी महाराजाचे गुरु होते.म्हणुन गुरुकुंजातील महाराजांना गुरुपोर्णिमेचे विशेष महत्व होते. कोणालाही गुरू माना. कोणताही पंथ स्वीकारा, पण आचरण शुद्ध ठेवा. मन शुद्ध ठेवा. देशाभिमान, धर्माभिमान, कुळाभिमान या गोष्टी आचरणातून व्यक्त करा. मी तर सामुदायिक ध्यानाचा पाठच गुरुमंत्र समजतो व तो सर्वांसहित जपत असतो असे महाराजांनी गुरुपंरपरेचे महत्व सांगितले आहे.

आज महासमाधी परीसरात भजन व अंभग गायन,सामदायिक ध्यान व प्रार्थना,प्रवचन,खंजेरी भजन,शास्त्रीय संगीत गायन, गुरुमहीमा व राष्ट्रवंदना इत्यादी कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले असुन महोत्सवाची सांगता आरतीने होणार आहे. गुरुपोर्णिमा महोत्सवाला मोठया संख्येने उपस्थित राहाण्याचे आवाहन अखिल भारतीय श्रीगुरुदेव सेवा मंडळाचे सर्वाधिकारी लक्ष्मण गमे,उपसर्वाधिकारी दामोदर पाटील,प्रचारप्रमुख प्रकाश वाघ,सरचिटणिस जनार्दन बोथे व अध्यात्म विभाग प्रमुख डॉ राजाराम बोथे यांनी केले आहे.

# सनातन संस्थेच्या वतीने अमरावती येथे 'गुरुपौर्णिमा महोत्सवा'चे आयोजन

## एक हजारपटीने कार्यरत असलेल्या गुरुतत्त्वाचा लाभ घेण्यासाठी 'गुरुपौर्णिमा महोत्सवां'त सहभागी व्हा ! – सनातन संस्थेचे आवाहन

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२० अमरावती**

हिंदु राष्ट्र अर्थात धर्मनिष्ठ समाज निर्मितीसाठी प्रयत्न करणे, ही काळानुसार सर्वोत्तम गुरुसेवाच आहे. हा संदेश देण्यासाठी 'सनातन संस्थे'च्या वतीने यंदा २१ जुलै २०२३ या दिवशी गुरुपौर्णिमा महोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे. अमरावती येथे गुरुपौर्णिमा महोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे.




हिंदु धर्मातील अद्वितीय अशी श्रेष्ठ परंपरा म्हणजे 'गुरु-शिष्य परंपरा' ! राष्ट्र आणि धर्म संकटात असतांना सुव्यवस्था निर्माण करण्याचे महत्कार्य गुरु-शिष्यांनी केल्याचा गौरवशाली इतिहास भारताला लाभला आहे. त्या त्या काळी अधर्म माजला असतांना भगवान श्रीकृष्णाने अर्जुनाकडून, आर्य चाणक्यांनी सम्राट चंद्रगुप्ताच्या आणि शिवछत्रपतींनी संत तुकाराम महाराज अन् समर्थ रामदासस्वामी यांच्या कृपेने आदर्श असे धर्माधिष्ठित राज्य स्थापन केले. आजही राष्ट्र आणि धर्म यांची दुःस्थिती झाली आहे, यावर एकमेव उपाय म्हणजे 'हिंदु राष्ट्र' स्थापन करणे हा होय. यासाठी पुढील ठिकाणी गुरुपौर्णिमेचे आयोजन करण्यात आले आहे.

अंबा मंगलम , महावीर नगर, सातुर्णा बस स्टॉप जवळ, अमरावतीवेळ : सायं. ५.३० वा. या महोत्सवात श्री व्यासपूजन आणि प.पू. भक्तराज महाराज यांचे प्रतिमापूजन (गुरुपूजन); समाज, राष्ट्र आणि धर्म यांविषयी मान्यवरांचे विचार; तसेच 'आनंद प्राप्ती आणी रामराज्याची स्थापना ह्यासाठी साधना' या विषयांवरही मान्यवर वक्त्यांचे विशेष मार्गदर्शन, तसेच 'स्वसंरक्षण प्रात्यक्षिके', विविध विषयांवरील अध्यात्मिक आणि धार्मिक ग्रंथप्रदर्शन, तसेच राष्ट्र-धर्म विषयक फलकप्रदर्शनही लावण्यात येणार आहे.

तरी सर्व राष्ट्र आणि धर्म प्रेमी हिंदूंनी सहकुटुंब उपस्थित राहून या अमूल्य पर्वणीचा लाभ घ्यावा, असे आवाहन सनातनच्या वतीने करण्यात आले आहे.

### ऑनलाईन' गुरुपौर्णिमा महोत्सव'

देश-विदेशांतील भाविकांना गुरुपौर्णिमेचा लाभ घेता यावा यासाठी सनातन संस्थेच्या वतीने 'ऑनलाईन गुरुपौर्णिमा महोत्सव' आयोजित करण्यात केले आहेत. २१ जुलैला 'गुरुपौर्णिमा महोत्सवां'चा लाभ घेण्यासाठी पुढील मार्गीकेवर (लिंकवरून) घेता येईल https://www.youtube.com/SSMarathi

# चांदुर बाजार तालुक्यातील पावसामुळे शेतकऱ्यांचे नुकसान

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२० चांदुर बाजार**

चांदुर बाजार तालुक्यातील शेतकरी मुसळधार पाऊससाने मोठ्या प्रमाणावर संकटामध्ये सापडला आहे. चांदूर बाजार तालुक्यात माधान, सोनेरी, ब्रा थंडी, भागात पावसाच्या पाण्याने कहर केला असून शेतकऱ्यांच्या कपाशी, तूर, सोयाबीन, संत्रा या सर्व पिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. या आधी शेतकरी पाऊस नाही म्हणून चिंतेत होते, मात्र आता अतिवृष्टीमुळे नवे संकट उभे झाले आहे. माधान, सोनेरी , ब्रा थंडी, या गावातील शेतकऱ्यांच्च्या शेतातील संत्रा ,कपाशी, सोयाबीन पीक पावसाच्या पाण्याखाली आले असून अनेक भागात पीक वाहून गेले. सलग सुरू असलेल्या पावसाने नदी, नाले भरून वाहत आहे. त्या मुळे काही गावामध्ये पाणी शिरले आहे त्यात काही भागात शेतकरी संकटात आहे अशा परिस्थितीमध्ये शेतकऱ्यांनी काय करावे, हे सुचेनासे झाले. चांदूर बाजार येथील तहसीलदार रूनय जपुलवार यांनी अधिकाऱ्यांना नुकसानाचे तत्काळ पंचनामे करण्याचे आदेश दिले आहे. मात्र अद्यापही प्रशासनाचा कुठलाही अधिकारी शेतकऱ्यांच्या बांधावर पोचला नाही त्यामुळे शेतकऱ्यांसह नुकसान झालेल्या नागरिकांना शासकीय पातळीवर मदत मिळण्याची आशा पल्लवित झाली आहे. या करिता सोनोरी, माधान, ब्रा थंडी गावातील नागरिकांनी तात्काळ पंचनामे करून मदत देण्यात यावी अशी मागणी केली आहे न झाल्यास शेतामध्ये साचलेल्या पाण्यामध्ये झोपून आंदोलन करू असा मोठा इशारा गावातील नागरिकांनी दिला आहे.

# चार हजारांवर कर्मचाऱ्यांनी मोफत रेशनवर मारला डल्ला रिकव्हरी होणार; पुरवठा विभागाची मोहीम

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२०अमरावती**

शासकीय, निमशासकीय सेवेत असतानाही रेशनच्या मोफत धान्याचा लाभ घेणे ४३७६ कर्मचाऱ्यांच्या अंगलट येणार आहे. या शासकीय कर्मचाऱ्यांना रेशन धान्याचा लाभ घेता येत नाही, तरीही कर्मचाऱ्यांनी लाभ घेतला असल्याचे 'सेवार्थ'च्या तपासणीत आढळून आले आहे. त्यामुळे या शिधापत्रिका एपीएल व्हाइटमध्ये करण्यात आल्या आहेत.

राष्ट्रीय अन्नसुरक्षा योजनेअंतर्गत लाभार्थ्यांना लाभ देण्यासाठी व पारदर्शकता आणण्यास योजनेमधील अपात्र लाभार्थ्यांची शोधमोहीम पुरवठा विभागाद्वारा राबविण्यात आली. यामध्ये वित्त विभागाच्या सेवार्थ प्रणालीमधून शासकीय अधिकारी व कर्मचारी यांचा डेटाबेस शिधापत्रिका व्यवस्थापन प्रणालीसोबत पडताळणी करण्यात आला. यामध्ये 'सेवार्थ' मध्ये आधार व पॅन नंबर लिंक असतो. तर शिधापत्रिका व्यवस्थापनमध्ये आधार लिंक असतो. याद्वारे अपात्र लाभार्थी यांची माहिती समोर आली. त्यामुळे या सर्व अपात्र लार्भार्थ्यांचा लाभ बंद करण्यात येऊन त्यांना पांढऱ्या शिधापत्रिका देण्यात आल्या आहेत.



### अपात्र शिधापत्रिकाधारक

| | |
|---|---|
| अपात्र शिधापत्रिकाधारक | ४३७६ |
| अंत्योदयमधील अपात्र | ६७२ |
| प्राधान्यमधील अपात्र | २६५६ |
| शेतकरी गटात अपात्र | २०४८ |

**असा मिळतो लाभ**

राष्ट्रीय अन्नसुरक्षेअंतर्गत अंत्योदय अन्न योजनेतील लाभार्थ्यांना प्रतिव्यक्ती प्रतिमाह ५ किलोप्रमाणे अन्नधान्य मोफत किंवा सवलतीच्या दराने देण्यात येते. त्यात ५९ हजार रुपयांपर्यंत वार्षिक उत्पन्न असणाऱ्या शिधापत्रिकाधारकांचा समावेश आहे.

### संबंधित शिधापत्रिकाधारकांचा लाभ बंद केला

शासकीय व निमशासकीय कर्मचाऱ्यांनी मोफत वा सवलतीच्या धान्याचा लाभ घेणे त्वरित बंद करावे, अन्यथा रिकव्हरी केली जाईल.

**– प्रज्वल पाथरे, सहायक जिल्हा पुरवठा अधिकारी**

# चुकीचे कागदपत्रवर प्रॉपर्टी कार्ड बळकावले

## जिल्हा भूमीअधिक्षकांकडे तक्रार!

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२०अचलपूर**

देशमुख लेआऊट विठ्ठलवाडी परिचित खिडकी गेट ते तहसील रस्ता लगत मौजे अचलपूर शीट नं. २१ प्लॉट नं. ११ तुकडा क्र. ५ मंजूर लेआऊटनुसार पोट हिस्सा मोजणी रेखाचित्र मो. र. क्र. ४८०/२००२ मध्ये करण्यात आली त्यावेळी खरेदी खाजगी लेआउट नुसार जोडून पूर्व - पश्चिम वाटणीचे उत्तरे कडील निम्मा भाग खरेदीमधील मूळ ठिकाण बदलवून नझुल रेकॉर्ड मध्ये तत्कालीन कर्मचारी निरीक्षक भूमी अभिलेख कार्यालय अचलपूर यांनी पोट हिस्सा मोजणी मध्ये वेगळ्या जागेवर फेरफार क्र.२५४ कायम दिनांक १३/७/ २००१ रोजी पूर्ण प्लॉटचे फेरफार करून प्रॉपर्टी कार्ड दिले असल्याची धक्कादायक तक्रार केली आहेप्राप्त माहितीनुसार अचलपूर विठ्ठलवाडी परिचित खिडकी गेट ते तहसील रस्ता लगत वेलकम पॉईंट बार ऍण्ड रेस्टॉरंट प्लॉटचे प्रॉपर्टी कार्ड धारकाने अर्जात दाखल केलेले खाजगी लेआउट प्लॉटची खरेदी जोडून मंजूर लेआऊट पोट हिस्सा मोजणीत फेरफार व प्रॉपर्टी कार्ड नियमबाह्य दिले असल्याचे आक्षेप येथील सामाजिक कार्यकर्ता विलास थोरात यांनी निवेदनातून जिल्हा भूमी अधीक्षक कार्यालय अमरावती व नगर परिषद कार्यालय अचलपूर येथे फेरफार व प्रॉपर्टी कार्ड रद्द करण्यासाठी चूकीचे खरेदीवर असलेले नियमबाह्य फेरफार व प्रॉपर्टी कार्डचे खरेदीप्रमाणे फेरतपासणी करण्याची मागणी केली आहे यामध्ये मंजूर लेआऊटनुसार पोट हिस्सा मोजणीचा प्लॉट व खाजगी लेआऊट खरेदीनुसार प्लॉट एकाच ठिकाणावर नसल्याने त्याची खरेदी खाजगी लेआऊटनुसार आहे तसेच मूळ मालक डॉ. संजीव देशमुख यांचे प्रतिज्ञापत्रमध्ये ११ प्लॉट ची परवानगी घेऊन त्यावर खाजगी लेआऊट १ ते ५८ प्लॉट पाडून विक्री केल्याचे गुंठेवारी रेकॉर्ड करण्यासाठी संमती दिल्याचे प्रतिज्ञापत्रावर कळविले आहे त्यानुसार नगर परिषद कार्यालय सर्व साधारण सभेचा ठराव क्र. ३० दि. ०७/०७/२००७ रोजी झाला शासनाची दिशाभूल करून खरेदीनुसार प्लॉटची जागा बदलवून मिळवलेले प्रॉपर्टी कार्ड मंजूर लेआऊट व खाजगी लेआऊट प्लॉट मध्ये तफावत निर्माण केली आहे यामुळे प्लॉट नं. २ व १७ ऐकाच जागेवर येऊन मालकी हक्काचे वाद विवाद झाले होते प्लॉट नं. २ चे पोट हिस्सा मोजणी मध्ये प्रॉपर्टी कार्ड उघडले अखेर प्लॉट नं १७ खाजगी लेआऊटनुसार खरेदी व मालमत्ता कर रिकामी झालेली जागेवर चूक दुरुस्ती लेखाने हस्तानातरन ताब्याने येथील रहिवाशी नागरिकांनी नगर परिषद कार्यालयात प्लॉट नं. १७ चे चतुर्सीमा चूक दुरुस्ती बाबत दि २९/०९/२०१२ रोजी प्लॉट नं. १७ बदललेली चतुर्सीमा मालमत्ता करा वर दुरुस्तीने भरणा करीत आहेत परंतु प्लॉट क्र. ५ ची जागा चतुर्सीमा बदलल्याचे कागदपत्रे चूक दुरुस्ती लेख मूळ मालकाकडून कोणताही दस्तऐवज जोडला नसतांना फेरफार व प्रॉपर्टी कार्ड नझुल रेकॉर्ड मध्ये शासनाची दिशाभूल करून मंजूर लेआऊट वर प्रॉपर्टी कार्ड धारकाने चुकीचे कागदपत्रे जोडून बनवलेले प्रॉपर्टी कार्ड, मालमत्ता कर पावती,बांधकाम परवानगी, वाईन बार लायसन्स रद्द करण्याची व दोषीवर कडक कार्यवाही करण्यासाठी सामाजिक कार्यकर्ता विलास थोरात यांनी निवेदणातून मागणी केली आहे.

# तिवसा पाणी पुरवठा योजनेसाठी कॉँग्रेसचे धरणे

## स्वाक्षरी मोहीम राबवत राज्य सरकारचा केला निषेध

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२० तिवसा**

शहरातील मंजूर असलेली पाणी पुरवठा योजना महायुती सरकारने रोखल्याने शहर तहानलेले आहे. त्यामुळे नागरिकांच्या हिताचे राजकारण, समाजकारण व्हावे, यासाठी शुक्रवारी तिवसा पोलिस स्टेशनसमोर काँग्रेस कमिटीच्या वतीने लक्षवेध धरणे आंदोलन करण्यात आले. या वेळी स्वाक्षरी - मोहीम राबवून महायुती सरकारचा निषेध करण्यात आला. योजनेसाठी आ. यशोमतीठाकूर यांनी विधानसभेत अनेक वेळा तारांकित व लक्षवेधी प्रश्न उपस्थित केले होते. नगराध्यक्ष, माजी नगराध्यक्ष, नगरसेवक यांनी सुद्धा वारंवार मुंबई येथे पाठपुरावा केला, विनंती पत्र दिली. परंतु, महायुती सरकारअंतर्गतच्या नगरविकास खात्याने या २८ कोटी रुपयांच्या पाणीपुरवठा योजनेची प्रशासकीय मान्यता प्रदान न केल्याने तिवसावासी रोष व्यक्त करत आहे. या वेळी माजी समाज कल्याण सभापती दिलीप काळबांडे, नगराध्यक्ष योगेश वानखडे, माजी नगराध्यक्ष वैभव वानखडे, शहराध्यक्ष सेतू देशमुख, खरेदी विक्रीचे संचालक प्रमोद वानखडे, नगरसेवक अमर वानखडे, सुनील बाखडे, उमेश राऊत, अंकुश देशमुख, स्वप्निल गंधे, आकाश मकेश्वर, प्रणव गौरखडे, गजानन बावणे, तुषार लेवटे आदींसह काँग्रेसचे पदाधिकारी, कार्यकर्ते व नागरिक उपस्थित होते.




# ...तर तिसऱ्या आघाडीचा प्रयोग शक्य; अजितदादांचे नाव घेत प्रकाश आंबेडकरांचे सूचक विधान

**विदर्भ प्रजासत्ताक दि.२० मुंबई**

आगामी विधानसभा निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर महायुती आणि महाविकास आघाडी दोन्ही गटांकडून जोरदार तयारीला सुरुवात झाली आहे. पुढील विधानसभा निवडणुकीत महायुती आणि महाविकास आघाडी या दोघांमध्ये थेट लढत असली, तरी राज्यात तिसऱ्या आघाडीबाबत चर्चा सुरू झाल्या आहेत. तिसऱ्या आघाडीचा प्रयोग प्रत्यक्षात येणार का, तिसरी आघाडी झाली तरी त्यात कोण कोण असेल आणि निवडणुकीत कसा परिणाम दिसू शकेल, याबाबत राजकीय वर्तुळात चर्चा आहेत. यातच वंचित बहुजन आघाडीचेप्रकाश आंबेडकर यांनी तिसऱ्या आघाडीबाबत सूचक विधान केले आहे.

पत्रकारांशी बोलताना प्रकाश आंबेडकर यांनी अनेकविध मुद्द्यांवर भाष्य केले. ओबीसी आणि मराठा आरक्षणावरून तेढ निर्माण झाली आहे ही खरी गोष्ट आहे. या राजकीय पक्षांना आरक्षणाचा मुद्दा विधानसभा निवडणुकीपर्यंत झुलवत ठेवायचे आहे. मतदारांना माझे असे आवाहन राहील की, त्यांनी आपल्याला झुलवत ठेवले तर आपणही त्यांना झुलवत ठेवायला हवे, असे प्रकाश आंबेडकर यांनी स्पष्ट केले.

# उद्या नितीन कदम यांचे मतदार नोंदणी शिबिर : जास्तीत जास्त तरूणाईंनी आपले नाव मतदार यादीत समाविष्ट करण्याचे आवाहन

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२०अमरावती**

संकल्प शेतकरी संघटनेचे अध्यक्ष नितीन कदम यांच्या संकल्पनेतून उद्या २१ जुलै रोजी ' भव्य मतदार नोंदणी अभियान' कार्यमाअंतर्गत सकाळीं १०:०० ते ०५:०० वाजेपर्यंत मतदार नोंदणीचे आयोजन मातोश्री रमाबाई आंबेडकर, बुध्द विहार, खंडेलवाल लेआऊट, मैत्री विहार कैलास नगर,महादेव खोरी येथे करण्यात आले आहे. या नव नोंदणी करिता रहिवासी पुरावा, वयाचा पुरावा, पासपोर्ट छायाचित्रासह ईतर दस्तऐवज आवश्यक असल्याचे संकल्प शेतकरी संघटनेच्या अधिकृत संकेतस्थळ येथुन महिती मिळाली आहे. लोकशाहीच्या बळकटीकरणासाठी नवयुवकांची भूमिका महत्त्वाची असून त्यासाठी मतदान प्रक्रियेत युवकांचा सहभाग वाढणे आवश्यक आहे. जास्तीत जास्त युवकांची मतदार नोंदणी व्हावी यासाठी संकल्प शेतकरी संघटना




प्रयत्नशील असून या कार्यक्रमात सहभाग घेवून मतदार नोंदणी करावी, असे आवाहन नितीन कदम यांनी आज केले.कदम यांनी मध्यामासोबत बोलतांना ' संकल्प शेतकरी संघटना व भारत निवडणूक आयोगातर्फे घेण्यात आलेल्या विशेष पुनरिक्षण कार्यक्रमांतर्गत नवीन मतदारांसह समाजातील दिव्यांग, तृतीयपंथी, वंचित घटक यांचा मतदान प्रक्रियेत सहभाग वाढावा यासाठी विविध कार्यक्रम आयोजित करून जनजागृती करण्यात येत आहे. शहरी भागात मतदान कमी प्रमाणात होते, त्याचे प्रमाण वाढणे आवश्यक आहे. १८ ते २९ वयोगटातील युवकांचे मतदार यादीत कमी प्रतिनिधित्व असून ते वाढणे आवश्यक आहे' असेही कदम म्हणाले.युवकांनी स्वत:च्या मतदार ओळखपत्राला आधार जोडणी करुन घेण्यासह कुटुंबातील सदस्यांनाही आधार जोडणीसाठी प्रोत्साहित करावे. सुदृढ लोकशाहीसाठी मिळालेल्या मतदानाच्या अधिकाराचा उपयोग करावा. मतदार यादीत आपले नाव नोंदवणे व मतदानात भाग घेणे हे आपले कर्तव्य आहे. महाविद्यालयातील १८ वर्षांच्या पुढील सर्व वयोगटातील युवकांनी मतदार नोंदणी करून घ्यावी, त्यासाठी विशेष करून शिक्षकांनी पुढाकार घ्यावा, असे आवाहनही कदम यांनी यावेळी केले आहे.

# रेल्वेचे सामान्य श्रेणीचे डब्बे आता वाढणार महत्त्वपूर्ण बदलामुळे प्रवाशांना दिलासा

## अंबा आणि विदर्भ एक्सप्रेसचाही समावेश

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२० अमरावती**

सामान्य श्रेणीतील प्रवाशांना सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी मध्य रेल्वेद्वारे वेगवेगळ्या लांब पल्ल्याच्या रेल्वे गाड्यांमधील सामान्य श्रेणीच्या डब्यांची संख्या वाढवली जाणार आहे. त्यामुळे सर्वसामान्य श्रेणीतून प्रवास करणाऱ्या प्रवाशांना मोठा दिलासा मिळेल. रेल्वेमधून प्रवास करणाऱ्यांची संख्या वाढत आहे. सामान्य श्रेणी डब्यांमध्ये तर प्रचंड गर्दी



असते. ही गर्दी कमी करण्यासाठी सामान्य श्रेणीचे डबे वाढविण्याचा निर्णय घेतला आहे. भुसावळ विभागातून जाणाऱ्या रेल्वे गाड्यांमध्ये कायमस्वरूपी अतिरिक्त सामान्य श्रेणी डबे बसवण्यात येणार आहेत.

यामध्ये विदर्भ एक्सप्रेस, मुंबई - अमरावती अंबा एक्सप्रेस,एलटीडी - बनारस एक्सप्रेस, एलटीडी - पाटलीपूत्र एक्सप्रेस, शालीमार एक्सप्रेस, एलटीडी - हावडा एक्सप्रेस, एलटीडी - पुरी एक्सप्रेस, सेवाग्राम एक्सप्रेस, मुंबई - हावडा मेल, हटिया एक्सप्रेस, हावडा - अहमदाबाद एक्सप्रेस, गीतांजली एक्सप्रेस, रांची एक्सप्रेस या गाड्यांना प्रत्येकी दोन अतिरिक्त सामान्य श्रेणीचे डबे जोडले जाणार आहेत, तर मुंबई - अमृतसर एक्सप्रेस, एलटीडी - अयोध्या, एलटीडी - बलिया, एलटीडी - जयनगर एक्सप्रेस, एलटीडी - बल्लारशाह एक्सप्रेस, एलटीडी - छपरा एक्सप्रेस, एलटीडी - गोरखपूर एक्सप्रेस, एलटीडी - सुलतानपूर एक्सप्रेस, एलटीडी - सीतापूर एक्सप्रेस, एलटीडी - प्रतापगड एक्सप्रेस, एलटीडी - आग्रा एक्सप्रेस, एलटीडी - राणी कमलापती एक्सप्रेस, पुणे - दानापूर एक्सप्रेस, , पुणे - काजीपेठ एक्सप्रेस, पुणे - लखनौ एक्सप्रेस, पुणे - जसडीह एक्सप्रेस या गाड्यांना प्रत्येकी एक सामान्य श्रेणीचा डब्बा जोडला जाणार असल्याची माहिती मध्य रेल्वेच्या भुसावळ विभागाकडून देण्यात आली.

# प्ले ग्रुप, नर्सरीवर नियंत्रण कोणाचे? अवाजवी शुल्कामुळे पालक झाले त्रस्त

## संस्था घेताहेत गैरफायदा: इंग्रजी माध्यमांच्या शाळांकडे वाढला पालकांचा कल

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२०अमरावती**

गेल्या काही वर्षांपासून शिक्षणाचे व्यापारीकरण, बाजारीकरण झाल्याचे दिसते. जि.प. व न.प.सह सरकारी शाळांकडे पाठ फिरवत खासगी शाळांकडे पालकांचा ओढा वाढला. याचा शिक्षण संस्थांनी गैरफायदा घेत अवाजवी शुल्क वसूल करण्याचा सपाटा लावला आहे.

प्री प्रायमरी शाळांची नोंदच नाही१ प्ले ग्रुप, नर्सरी या शाळांची अनेक ठिकाणी नोंदच केली जात नसल्याचा प्रकार जिल्ह्याच्या शहरी भागात सुरू आहे. शहरात प्ले ग्रुप, नर्सरी शाळांची संख्या झपाट्याने वाढत आहे. दरम्यान पालकांकडून अव्वाच्या सव्वा शुल्क वसूल केले जात असून, त्यांच्या खिशाला आर्थिक झळ बसत आहे.

माझ्या पाल्याला खासगी शाळेतच शिक्षण द्यायचे, असा हट्ट केला जातो. त्यामुळे यावर नियंत्रण कोणाचे, असा प्रश्न आहे.




### वर्षाचे शुल्क २० हजारांपासून ३० हजारांपर्यंत

शिक्षण कसे चांगले देऊ, असा दिखावा नर्सरी आणि प्ले ग्रुप शाळांकडून पालकांना केला जातो. त्यामुळे पालकही प्रवेश घेण्यास तयार होतात. एका वर्षाचे शुल्क २० हजारांपासून ३० हजारापर्यंत शाळांकडून घेतले जात आहे. तर, काही शाळा मोठ्या वर्गासाठी यापेक्षाही जास्त शुल्काची वसुली करीत असल्याचे दिसून येते.

### तक्रार कोठे करायची ?

सदर शाळांनी किती शुल्क आकारायचे याबाबत कुठलेच नियंत्रण नसल्याने पालकांनी तक्रार कोठे करायची, असा प्रश्न आहे. याची जबाबदारी शिक्षण विभागाची आहे.

या शाळांची शिक्षण विभागाकडेही नोंद केली जात नाही.

शाळांनी शुल्क किती आकारावे यासंदर्भात कुठलाच नियम नसून, मनमानी पद्धतीने विद्यार्थ्यांकडून फी वसूल केली जाते. यावर नियंत्रण कोणाचेच नसल्याचे चित्र आहे.

# मेघा नदीवर पुलाची नितांत गरज पुढारी लक्ष घालतील का ?



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२० चांदुर बाजार**

चांदुर बाजार तालुक्यातील श्री क्षेत्र देऊरवाडा येथे मेघा नदिच्या बाजूला महानुभाव पंथाचे श्रध्दा स्थान आहे त्या ठिकाणी दोन दिवसापासून सुरू असलेल्या पाऊसामुळे मेघा नदीला पुर आला आहे त्या मंदीरात राहत असलेल्या परिवार मधील वयोवृध्द ९५ वर्षाच्या आजिला प्रकृति बरी नसल्या मुळे बैल गाडी मध्ये उपचार करीता न्यावे लागलेआहे ही अवस्था पूल नसल्याने झाली आहे मात्र या कडे कोणी तरी जातीने लक्ष देणे गरजेचे आहे या ठिकाणी प्रसिद्ध श्री महानुभाव पंथ यांचे मंदिर आहे या ठिकाणी भाविकांची मोठ्या संख्येने येतात मात्र नदीला पूर आल्याने जाणे शक्य होत नाही जायचे असल्यास जीव मुठीत ठेऊन जावे लागते या गोष्टी ची दखल प्रशासन व राजकीय नागरिक यांनी घेणे खुप महत्वाचे आहे या पुलाच्या आजू बाजू लागावकरी,शेतकरी,भाविक भक्त साधू संत मोठ्या संख्येने राहतात त्यामुळे लवकर पूल देण्यात यावा या अशी मागणी सुदर्शन दादा कारंजेकर,विजय मेटांगे,मोहणराज दादा,संजू भाऊ कविटकर, सुरेश भाऊ सरदार,मोहण भाऊ उईके,पंकज कारंजेकर व गावातील नागरिक यांनी केली आहे

# पालकांनो, वयाच्या १८ वर्षापर्यंत आता मोठ्या शस्त्रक्रिया मोफत

## खर्चाची चिंता नको : शासनाकडूनच दिली जाते रुग्णालयाला रक्कम

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२०अमरावती**

पालक मुलांना अगदी तळहाताच्या फोडाप्रमाणे जपतात. त्याला थोडेही दुखणे झाले की, पालकांचा जीव कासावीस होतो. अशातच एखादा गंभीर आजार जडला आणि डॉक्टरांनी शस्त्रक्रिया सांगितली, तर काय करावे, हे सुचत नाही. आता मात्र, मुलावर शस्त्रक्रिया करायची वेळ आल्यास चिंतेचे कारण नाही. केंद्र आणि राज्य शासनाच्या राष्ट्रीय बाल स्वास्थ कार्यक्रमांतर्गत ० ते १८ वर्षापर्यंतच्या सर्व बालकांवर मोफत शस्त्रक्रिया करण्यात येते.

डॉक्टरांनी एखादी शस्त्रक्रिया करावी लागणार असे समोर आल्यास पालक चिंतेत पडतात. आता आपल्या मुलाचे काय होणार, असा प्रश्न त्यांना पडतो. मात्र, राष्ट्रीय बाल स्वास्थ कार्यक्रमांतर्गत नागपूर व मुंबई येथील शासनाने टायअप केलेल्या नामांकित रुग्णालयात मोठी शस्त्रक्रिया करण्यात येते. याचा खर्च शासनाकडून रुग्णालयाला दिला जातो.या योजनेत मोफत शस्त्रक्रियेचा लाभ




### काय आहे राष्ट्रीय बाल स्वास्थ्य कार्यक्रम?

जिल्ह्यात राष्ट्रीय बाल स्वास्थ्य कार्यक्रमातंर्गत शाळा व अंगणवाडीत नियमित तपासणी करण्यात येते. या तपासणीदरम्यान काही आजार आढळून आल्यास आजारी बालकांना जिल्हास्तरावर संदर्भसेवा देऊन उपचार करण्यात येतात. मोठी शस्त्रक्रिया नागपूर व मुंबईत करण्यात येते.

मिळावा यासाठी 'आरबीएसके केंद्राशी संपर्क साधता येतो.जिल्हास्तरावर आरबीएसके समन्वयक आहेत. त्यांच्याशी संपर्क साधल्यास आवश्यक ते सहकार्य त्यांच्याकडून करण्यात येते.राष्ट्रीय बालस्वास्थ्य कार्यक्रमातंर्गत जन्मजात हृदयरोग, अस्थरोग, दातांची, ऐकू येण्यासाठी क्याक्लिअर इम्प्लांट, डोळ्यांचे उपचार, फाटलेले ओठ, दुभंगलेले टाळू, जन्मतः वाकडे पाय आदी प्रकारच्या शस्त्रकिया मोफत करण्यात येतात.राष्ट्रीय बाल स्वास्थ्य कार्यक्रमातंर्गत ० ते १८ वर्षापर्यंतच्या बालकांवर मोठ्या शस्त्रक्रिया मोफत करण्यात येते. गंभीर स्वरूपाची हृदय शस्त्रक्रिया आणि कर्णबधिरसंदर्भात शस्त्रक्रिया करणे गरजेचे असेल तर अशा बालकांना करार करण्यात आलेल्या रुग्णालयात शस्त्रक्रिया करण्यात येते.

# विदर्भ, मराठवाड्यातील उद्योगांचे वीज शुल्क माफ

## ३१ मार्च २०२९ पर्यंत वीज बिलात ७.५ टक्के सवलत

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२०नागपूर**

विदर्भ आणि मराठवाड्यातील उद्योगांना दिलेली वीज शुल्क माफी तब्बल साडेतीन महिन्यांनी सुरू ठेवण्याचा निर्णय राज्य सरकारने घेतला आहे. आता या दोन्ही भागातील नवीन आणि जुन्या उद्योगांच्या वीज बिलात ७.५ टक्के (इलेक्ट्रिसिटी ड्यूटी) वीज शुल्क आकारले जाणार नाही.



विदर्भ आणि मराठवाड्यातील औद्योगिक मागासलेपणा लक्षात घेऊन राज्य सरकारने दोन्ही भागातील उद्योगांना प्रोत्साहन देण्यासाठी अनुदानासह वीज शुल्क माफ केले होते. दोन्ही योजनांची मुदत ३१ मार्च २०२४ रोजी संपली. शासनाने अनुदान देण्याचा निर्णय घेतला होता. मात्र वीज शुल्काबाबत संभ्रम निर्माण झाला होता.

दरम्यान, विदर्भ आणि मराठवाड्यातील औद्योगिक संघटना शुल्क माफीची मागणी करीत होते. अखेर, राज्य सरकारच्या उद्योग, कामगार, ऊर्जा आणि खनिकर्म विभागाने यासंदर्भात शासन निर्णय जारी केले. २८ मे २०१९ च्या शासन निर्णयान्वये विदर्भ आणि मराठवाड्यातील उद्योगांचे वीज शुल्क ३१ मार्च २०२४ पर्यंत माफ करण्यात आल्याचे सांगण्यात आले. आता ही वीज शुल्क माफी ३१ मार्च २०२९ पर्यंत सुरू राहणार आहे. याबाबत ऊर्जा विभाग लवकरच अधिसूचना जारी करणार आहे.

**गेल्या तीन महिन्यांचे काय?**

एप्रिल, मे आणि जून महिन्याच्या बिलांमध्ये उद्योगांना वीज शुल्कासह वीजबिले प्राप्त झाली आहेत. मात्र, ही वीज शुल्क माफी १ एप्रिल २०२४ पासूनच लागू होईल, असे राज्य सरकारने स्पष्ट केले आहे. मात्र हे पैसे उद्योगांना कसे परत मिळणार हे अद्याप स्पष्ट झालेले नाही. त्यासाठी उद्योगांना ऊर्जा विभागाच्या सूचनेची प्रतीक्षा करावी लागणार आहे.

**वीज शुल्क म्हणजे काय?**

वीज बिलाच्या माध्यमातून वीज शुल्क वसूल केले जाते. जेथे ऊर्जा शुल्क, वाहतूक शुल्क, इंधन समायोजन शुल्क इत्यादी महावितरणच्या खात्यात जातात. तर वीज शुल्क राज्य सरकार भरते. हा निधी पायाभूत सुविधांच्या विकासासाठी वापरला जाईल, असा दावा केला जात आहे. उद्योगांकडून ७.५ टक्के शुल्क आकारले जाते.

# झेडपीच्या सात उपअभियंत्यांना कारणे दाखवा नोटीस

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२० अमरावती**

जिल्हा परिषद बांधकाम विभागाच्या कार्यकारी अभियंत्यांनी आपल्या अधिनस्त असलेल्या सात उपअभियंत्यांना इतर जिल्हा मार्ग, ग्रामीण मार्गावरील पूल, मोऱ्या व रपट्यांचे प्री-मान्सून निरीक्षण करण्याचे आदेश गत मे महिन्यात दिले होते. केलेल्या निरीक्षणाचा अहवाल सादर करण्याच्या लेखी स्वरूपात सूचना दिल्या असताना याकडे दुर्लक्ष केल्यामुळे वरील सात उपअभियंत्यांना कारणे दाखवा नोटीस बजाविण्यात आली आहे. तीन दिवसांत याबाबत खुलासा मागविला आहे.



जिल्हा परिषद बांधकाम विभागाच्या अखत्यारित येणाऱ्या ग्रामीण भागातील इतर जिल्हा मार्ग, ग्रामीण मार्ग या रस्त्यावरील पूल, मोऱ्या, रपटे यांचे प्री-मान्सून निरीक्षण करण्याचे आदेश मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी १४ मे रोजी दिले होते. त्यानुसार कार्यकारी अभियंता यांनी बांधकाम विभागाचे सातही उपअभियंता यांना १६ मे रोजी लेखी आदेश देऊन उपविभागांतर्गत येणाऱ्या वरील रस्त्यांची मान्सून पूर्व निरीक्षण करून धोकादायक तथा क्षतिग्रस्त असलेले रपटे, मोऱ्या, पूल यांना चिन्हांकित करण्यात यावे, त्याबाबतचा अहवाल सादर करण्याचे बजाविले होते.


सोबतच सदर कामे योग्य त्या कार्यक्रमात प्राधान्याने प्रस्तावित करावी व उपविभागाच्या अधिनस्त असलेल्या शाळा, आरोग्य केंद्र, अंगणवाडी, ग्रामपंचायत भवन आदी इमारतींची पाहणी करून धोकादायक व मोडकळीस आलेल्या इमारतींच्या दुरुस्तीबाबत माहिती तयार करून त्याबाबतचा अहवाला मागविला होता. मात्र, यासंदर्भातील अहवाल सादर न केल्याने याप्रकरणी सातही उपअभियंत्यांना कारणे दाखवा नोटीस बजावून खुलासा मागविला आहे.

जिल्हा परिषद बांधकाम विभागाच्या अखत्यारित येणाऱ्या सात उपविभागांतील रपटे, मोऱ्या, पूल व शाळा, अंगणवाडी व आरोग्य केंद्राच्या इमारतींचे प्री-मान्सून निरीक्षण करून उपअभियंत्यांमार्फत अहवाल मागविला होता. मात्र, अहवाल अप्राप्त असल्याने कारणे दाखवा नोटीस बजावून खुलासा मागविला आहे.

**-दिनेश गायकवाड, कार्यकारी अभियंता, बांधकाम**

# गुन्हेगारी वाढली; कारागृहे हाऊसफुल, नवीन कारागृहांचा प्रस्ताव प्रलंबित

## राज्यात ६० कारागृहे : बंदीक्षमता २७ हजार ११०, कारागृहात प्रत्यक्षात ४० हजार ४२८ कैदी बंदिस्त



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२०अमरावती**

गुन्हेगारीचे स्वरूप बदलले असून यात दिवसेंदिवस वाढ होत चालली आहे. परिणामी, राज्यातील कारागृहे ही सुधारणा व पुनर्वसन हे नव्हे तर आता गुन्हेगारांचे हब म्हणून नावारूपास येत आहे, तसेच देश-विदेशातील बंदिस्त कैद्यांमुळे कारागृहे ही हाऊसफुल झाली असून राज्यात ६० कारागृहांमध्ये ४० हजार ४२८ कैदी बंदिस्त आहेत. अधिकृत बंदीक्षमतेपेक्षा १३ हजार ३१८ कैदी जास्त ठेवण्यात आले आहेत.

### बंदीप्रकारावर एक नजर...

बंदीक्षमता : २७ हजार ११०
प्रत्यक्षात बंदिस्त कैदी : ४० हजार ४२८
सिद्धदोष : ७४७७ (पुरुष : ७१७०, स्त्री : ३०६, तृतीयपंथी : १) न्यायाधीन : ३२४५३ (पुरुष : ३१०८६, स्त्री : १३५१, तृतीयपंथी : १६) स्थानबद्ध व इतर : ४८९

कारागृहांत निम्म्या मनुष्यबळावर क्षमतेपेक्षा दुप्पट कैद्यांचा भार आला आहे. त्यामुळे कारागृहांची अंतर्गत व बाहेरील सुरक्षा भेदत मोठे गुन्हे घडत आहेत. हे चित्र संपूर्ण राज्यातील कारागृहांमध्ये असून क्षमतेपेक्षा दुप्पट बंदीवान आहेत. राज्यभरात

कारागृहात बंदीजनांची गर्दी वाढली हे वास्तव आहे. नव्याने १० ते १२ कारागृहांच्या निर्मितीचा प्रस्ताव शासनाकडे पाठविला आहे. खुले कारागृहांच्या क्षमता वाढीमुळे गर्दी कमी करण्यात येत आहे, तसेच केंद्र शासनाच्या योजनेंतर्गत गरीब कैद्यांना न्यायालयीन मदतीद्वारे कारागृहातून बाहेर पाठविण्यात येत आहे. गत वर्षभरात १८९७ कैदी खुले कारागृहात पाठविले आहेत.

**- डॉ. जालिंदर सुपेकर, प्रभारी तुरुंग महानिरीक्षक, महाराष्ट्र**

गुन्हेगारीचे प्रमाण वाढल्यामुळे आता कारागृहात बंदी ठेवायला अडचणी येत असल्याचे वास्तव आहे. कैदीसंख्या जास्त आणि मनुष्यबळ कमी ही नित्याचीच बाब झाली आहे. त्यामुळे अनेक कारागृहांमध्ये होमगार्डची सुरक्षेसाठी मदत घेण्यात येत आहे. विशेषत: शिपाई पदाची कमतरता ही कारागृह अधीक्षकांसमोर मोठी समस्या उद्भवत आहे. मुंबई, येरवडा, नाशिक, नागपूर, छत्रपती संभाजीनगर मध्यवर्ती कारागृहात देश-विदेशातील गंभीर गुन्ह्याचे आरोपी बंदिस्त असल्याने तोकड्या मनुष्यबळामुळे अंतर्गत व बाह्य सुरक्षेचा मोठा ताण यंत्रणेवर येत असल्याचे वास्तव आहे.